# इन्कम टॅक्स डिपार्टमेंट को – ऑप. बँक लि., मुंबई

आयकर भवन, महर्षी कर्वे मार्ग, चर्चगेट, मुंबई – ४०० ०२०.

## १८ व्या अधिमंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक २९.०८.२०२४ चे इतिवृत्त

इन्कम टॅक्स डिपार्टमेंट को–ऑप. बँक लि. मुंबई या बँकेची १८ व्या अधिमंडळाची वार्षिक सभा गुरूवार, २९ ऑगस्ट, २०२४ रोजी दुपारी ३.०० वाजता आयकर भवन, महर्षी कर्वे मार्ग, चर्चगेट, मुंबई कार्यालयाच्या बहुउद्देशीय सभागृहात (शामीयानामध्ये), मुंबई ४०० ०२० येथे आयोजित करण्यात आली होती. सदरच्या सभेला नियोजित वेळेत गणसंख्या नसल्यामुळे बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अजित जाधव यांनी उपविधी क्र. ३३(१) नुसार, गणसख्ये अभावी सभा अर्ध्या तासाकरिता तहकूब करण्यात येत आहे तसेच सदर सभा अर्ध्या तासानंतर ठीक ३.३० वाजता पुन्हा याच ठिकाणी सुरू करण्यात येईल व त्यावेळी सभेस गणसंख्येची आवश्यकता राहणार नाही असे सभागृहास सांगितले.

गणसंख्येअभावी अर्ध्यातासाकरीता तहकूब करण्यात आलेले सभेचे कामकाज ठीक ३.३० वाजता सुरू झाले. सभा सुरू होते वेळी ६५५ सभासद उपस्थित होते. बँकेचे मा. मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अजित जाधव यांनी उपस्थित सर्व सभासदांचे हार्दिक स्वागत केले आणि सर्व मा. संचालक मंडळ सदस्यांना मंचावर स्थानापन्न होण्याची विनंती केली. त्यानंतर त्यांनी सांगितले की, आजच्या सभेचे सुत्रसंचालन मा. संचालक श्री. प्रमोद वाघे करतील. त्यानंतर श्री प्रमोद वाघे यांनी मा. उपकार्याध्यक्ष श्री. संदीप आंबोकर यांना बँकेचे उपाध्यक्ष मा. श्री. शीतल तळपदे यांना व्यासपीठावर सन्मानपूर्वक घेऊन येण्याची विनंती केली.

त्यानंतर त्यानी सगितले की, कामाच्या व्यस्ततेमुळे बँकेचे पदसिध्द अध्यक्ष आपल्या आयकर विभागाचे प्रधान मुख्य आयकर आयुक्त मा. श्री. राज टंडन साहेब या सभेस उपस्थित राहू शकत नसल्यामुळे मी बँकेचे उपाध्यक्ष मा. श्री. शीतल तळपदे साहेब यांना आजच्या १८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे अध्यक्ष पद भुषवावे अशी मी बँकेच्या संचालक मंडळाच्या वतीने विनंती करतो. त्यानूसार मा. श्री. शीतल तळपदे साहेब यांनी सभेच्या अध्यक्ष पदाचा स्विकार केला.

त्यानंतर मा. श्री. प्रमोद वाघे यांनी सभेचे अध्यक्ष, बँकेचे उपकार्याध्यक्ष , बँकेचे उपस्थित संचालक मंडळ सदस्य आणि बँकेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सभेच्या कामकाजास सुरूवात करण्यापूर्वी दिप प्रज्वलन करण्याची विनंती केली. त्यानूसार समस्त संचालक मंडळाने दिप प्रज्वलन केले.

दिप प्रज्वलना नंतर मा. उपकार्याध्यक्ष श्री. संदिप आंबोकर यांच्या हस्ते सभेचे अध्यक्ष मा. श्री. शीतल तळपदे यांचा पुष्पगुछ देऊन सत्कार करण्यात आला. त्याच प्रमाणे मा. संचालक श्री. रवी शंकर यांच्या हस्ते मा. उपकार्याध्यक्ष श्री. संदीप आबोकर यांचा सत्कार करण्यात आला. त्यानंतर मा. संचालक श्री. प्रमोद वाघे यांनी बँकेचे उपकार्याध्यक्ष श्री. संदिप आंबोकर यांना स्वागतपर भाषण करण्याची विनंती केली.

**मा. उपकार्याध्यक्ष श्री. संदीप आंबोकर यांनी त्यांच्या स्वागतपर भाषणात सभागृहाला संबोधीत करताना** सर्व प्रथम बँकच्या संचालक मंडळाच्यावतीने उपस्थित सर्व सभासदांचे हार्दिक स्वागत केले आणि सर्व सभासदांना त्याचे रजिस्ट्रेशन करण्याची विनंती केली. ते म्हणाले की, आपल्या वार्षिक अहवालातील आकडेवारी वरून आपल्याला बँकेच्या प्रगतीची कल्पना आली असेल. यंदाही बँकेने आपला नफा कायम राखला आहे. त्याच प्रमाणे बँकेच्या



INCOME-TAX DEPT. CO-OP. BANK LTD. * MUMBAI * SEAL

## १८ व्या अधिमंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक २९.०८.२०२४ चे इतिवृत्त

प्रचलीत पदधतीनूसार या वर्षीही संचालक मंडळाने सभासदांना १५% लाभांश आणि सबक्रीपशन रक्कमेवर १५% व्याज देण्याची शिफारस केली आहे. त्यानी पुढे सांगितले की, संचालक मंडळ सभासदाकडून येणाऱ्या प्रत्येक सुचनेचे स्वागतच करेल तरी सभासदाकडून ज्या सूचना येतील त्यावर आपण विचारविनिमय करून निर्णय घेऊ. त्यानंतर त्यानी सांगितले की, बँकेचा नेट एनपीए जरी ०.३३% दिसत असला तरी ग्रॉस एनपीए २.२६% इतका आहे, जे चींता जनक आहे. ते म्हणाले की, एनपीए मध्ये वाढ होण्याचे प्रमुख कारण पीएफमस रूल हे आहे. हा नियम आल्या पासून आपल्याला सभासदाच्या बेसिक पगाराच्या रक्कमे पेक्षा जास्त पगार कपात मिळत नाही. त्यामुळे हा नियम येण्यापूर्वी आपण जी कर्जे दिली त्या कर्जाबाबत कर्जाच्या हप्त्यापेक्षा कमी कपात मिळत असल्यामुळे थकबाकीचे प्रमाण वाढले आहे. या संदर्भात आम्ही संबंधीत सर्व सभासदांना विनंती केली आहे की, त्यानी कर्जाच्या हप्त्यानूसार अतिरिक्त रक्कम त्यांच्या बचत खाती जमा ठेवावी परंतु अनेक कर्जदार या सूचनेचे पालन करीत नसल्यामुळे एनपीएच्या रक्कमेत वाढ झालेली आहे. त्यानंतर त्यांनी संबधीत सभासदांना सदर सूचनेनूसार अतिरिक्त रक्कम बचत खाती जमा ठेवून बँकेला सहकार्य करण्याची विनंती केली. त्यानंतर त्यांनी खालील विषेश बाबी ज्यामुळे कर्जे एनपीए होतात त्या सभेपुढे सादर केल्या आणि त्याबाबत सभासदांनीच उपायोजना सांगावी अशी विनंती केली.

१. काही सभासद परस्पर डी.डी.ओ कडून आपले मॅनडेट बदलून घेतात. त्यामुळे त्याचे कर्ज खाते थकीत होते असे करणे सभासदांनी टाळावे.

२. काही सभासद असे आहेत की, ज्यांची नेमणूक डी.डी.ओ मध्ये आहे किंवा त्यांची मित्र मंडळी डी.डी.ओ. मध्ये आहेत असे सभासद बँकेकडून त्यांच्या कर्जाच्या केलेल्या मागणी पत्रामध्ये बदल करून ती कमी करतात.

३. काही सभासद वारंवार कर्ज घेऊन कर्ज रक्कम त्याच लेवलला ठेवतात. अश्या सभासदांबाबत आमच्या असे निर्देशनास आले आहे की, त्यांनी आपली पी.एफ.ची रक्कम सुध्दा काढून घेतली आहे. त्यामुळे भविष्यात त्यांच्याकडून वसूली करण्यास अडचण उदभवणार आहे.

या संदर्भात त्यांनी सभासदांना विनंती केली की, कृपया त्यांनी असे प्रकार करू नयेत कारण आपल्या कडे ज्या ठेवी आहेत त्या आपल्याच सभासदाच्या आहेत आणि असे प्रकार करून आपण आपल्याच सभासदांना अडचणीत आणत आहोत याची आपण जाणीव ठेवावी.

काही आपले सभासद मृत आहेत परंतु ते ज्याना जामिनदार आहेत त्यांनी त्याच्या ऐवजी दुसरा जामिनदार बदलून न दिल्यामुळे त्यांच्या संदर्भात बँकेला नाहरकत पत्र देता येत नाही व त्यामुळे त्यांची आयकर विभागाकडून देय असणारी रक्कम त्यांच्या वारसास मिळत नाही याचे ही भान संबधीत सभासदानी ठेवावे अशी त्यांनी विनंती केली.

त्यांनी पुढे सांगितले की, आयकर विभागाच्या प्रशासन विभागाकडून आपल्याला नेहमीच सहकार्य मिळते परंतु त्यानाही मृत व्यक्तीची देय रक्कम का दिली नाही? याचे वारंवार स्पष्टीकरण द्यावे लागते. त्यामुळे त्यांनी आता सांगितले आहे की, जर यापुढे तुमची एनओसी वेळेत आमच्याकडे आली नाही तर आम्ही मृत व्यक्तीची रक्कम त्यांच्या वारसाला देऊन टाकु. तरी सभासदांनी याची गंभीर दखल घ्यावी अशी त्यांनी विनंती केली.

ते पुढे म्हणाले की, काही सभासद एलपीसी मध्ये बदल झाल्यास बँकेला कळवत नाहीत अश्या प्रकारामुळे ही कर्ज खाती थकीत होत असून आम्हाला इच्छा नसतानाही त्यांचावर अप्रिय कारवाई करावी लागते. या संदर्भात त्यांनी सांगितले की, अश्या वरिल प्रकारे जाणूनबुजुन जे सभासद त्यांचे खाते एनपीए मध्ये ठेवीत आहे अश्या सभासदांना ब्लॅक लिस्ट मध्ये टाकण्याचा आम्ही विचार करित आहोत.



INCOME-TAX DEPT CO-OP BANK LTD * MUMBAI *

तरी सभासदानी याबाबत प्रश्नोत्तराच्या वेळी आम्हाला अभिप्राय द्यावेत असे त्यानी सांगितले. ते पुढे म्हणाले की, १८ व्या अधिमंडळाचे हे जे वर्ष आहे ते आमचे पाचवे व अखेरचे वर्ष आहे. या पाच वर्षामध्ये घेतलेल्या महत्वाच्या निर्यणांचा आढावा घेताना त्यांनी सांगितले की, आमच्या काळामध्ये फेस्टीवल अॅडव्हास सारखी लोकप्रिय योजना सुरू करण्यात आली. ज्यामध्ये बँक कोणत्याही प्रकारचे व्याज घेत नाही. सणासुदीच्या काळामध्ये सभासदांना या योजनेमार्फत चांगली रक्कम मिळते. इतर कर्जाबाबतही कमीतकमी कागदपत्रात बँक दोन तासामध्ये कर्ज देते. या सेवेमध्ये आपले कर्मचारी आणि कर्ज अधिकारी यांचा सिंहाचा वाटा आहे असे त्यांनी सांगितले. वैदयकिय मदतीतही आपण वाढ केली आहे. आपण आज दोन लाख इतकी रक्कम सभासद कल्याण निधीमधुन वैदयकिय मदत म्हणून देत आहोत. त्याचा ही बऱ्याच सभासदांना फायदा झाला आहे. रिटायरमेंट बेनिफिट सुध्दा सभासदांना आपण वाढवून दिले आहे. सगळयात महत्वाचे म्हणजे कोविड कालावधीमध्ये त्यावेळेचे आपले आध्यक्ष श्री. रूपेश बेसेकर साहेब ,, इतर संचालक सदस्य आणि कर्मचारी यांनी आपली बँक सुरू ठेवली. त्यावेळी क्लिअरिंग सुरळीत चालू ठेवण्यात आले होते. कॅश उपलब्ध होत नव्हती तरी ही सभासदांची गैरसोय होऊन दिली नाही. काही लोकांना घरी रोख रक्कम पोचविण्याची व्यवस्थाही करण्यात आली होती.

त्यानी पुढे सांगितले की, आपण डिजिटल बँकिंगकडे वळलो आहोत त्या करिता आपण आपले सॉफ्टवेअर बदलले आणि बी.एस.जी. आयटी सॉफ्टवेअर लि. या कंपनीचे नविन सॉफ्टवेअर कार्यावित केले. ते म्हणाले की, सुरूवातीला या सॉफ्टवेअरमध्ये काही अडचणी आल्या. त्यावेळी सभासदांना जो त्रास झाला त्याबद्दल मी व्यक्तीशः संचालक मंडळाच्यावतीने दिलगीरी व्यक्त करतो आणि सभासदांनी केलेल्या सहकार्याबद्दल त्यांचे आभार मानतो. त्यांनी सांगितले की, आता हे सॉफ्टवेअर सुरळीत झाले आहे आणि आता आम्ही युपीआय बेस व्यवहाराची सुविधा सभासदांना देण्याचा विचार करित आहोत. त्यांनी पुढे अशी माहिती दिली की, अहवाल सालात कर्मचारी भरती ही झालेली आहे. आपले काही जूने कर्मचारी निवृत्त झाले त्याचप्रमाणे कोअर बँकिंगमुळे कर्मचाऱ्यांवर कामाचा ताण आला होता. त्यामुळे आयबीपीएस या मान्यता प्राप्त नामांकित संस्थेमार्फत आपण भरती केली आहे. सदर भरती पूर्णपणे गुणवत्तेच्या आधारावर झालेली असून हे नविन कर्मचारी बँकेला चांगल्या प्रकारे सेवा देत आहेत आणि त्याचा भविष्यात आपल्याला निश्चितच फायदा होईल असे त्यांनी सांगितले.

ते पुढे म्हणाले की, दिवसें दिवस आपल्या सभासदांची संख्या कमी होत आहे. तरी माझी सभासदांना विनंती आहे की, आपल्या बरोबर जे नविन कर्मचारी रूजु झालेले आहेत त्यांना बँकेचे सभासद होण्याची विनंती करा. तसेच बँकेच्या ठेवी वाढविण्यासाठीही प्रयत्न करा असे त्यांनी सांगितले. ते म्हणाले की, आपल्या बँकेच्या ठेवी सुरक्षित आहेत आणि आपण व्याजही आकर्षक देतो. तसेच आपण कमीतकमी व्याजदरात कर्ज देत आहोत. तरी या गोष्टी तुम्ही लोकांना समजवून सांगा अशी त्यांनी विनंती केली.

त्यानंतर ऋणनिर्देश करताना त्यांनी सांगितले की, आपले पदसिध्द अध्यक्ष श्री. यशवंत चव्हाण साहेब यांचा कालावधी फेब्रुवारी २०२४ पर्यंत होता तसेच आता जे प्रधान मुख्य आयकर आयुक्त श्री. राजसिंह टंडन साहेब आहेत यांनी सुध्दा बँकेचे कोणतेही काम असेल तरी तुम्ही बिनदिक्कत आमच्याकडे या आमचे तुम्हाला नेहमीच सहकार्य असेल असे सांगितले आहे. तरी त्यांचे आम्ही आभारी आहोत.

तसेच आपले तत्कालीन कार्याध्यक्ष श्री. रूपेश बेसेकर साहेब यांची पदोन्नतीमुळे भुवनेश्वर येथे असिस्टंट कमिशनर म्हणून बदली झाली. त्यांनी या चार वर्षात बँकेचे कामकाज पाहिले त्यांच्याबद्दल ही आम्ही कृतज्ञता व्यक्त करतो. त्याच प्रमाणे प्रशासनामध्ये श्री. श्रीवास्तव साहेब, श्री. लोटलीकर साहेब श्री. प्रकाश होलम साहेब आहेत यांचे कायम आम्हाला सहकार्य प्राप्त होते. ते चांगल्या प्रकारे आमच्याशी समन्वय साधतात, बँकेची वसूली करताना आम्हाला नेहमीच त्यांची मदत होते. तरी त्यांचा ऋणनिर्देश मी व्यक्त करतो.

त्यांनी पुढे सांगितले की, वसूली संदर्भात एकादया सभासदाबद्दल आपल्याला काही माहिती असेल तर ती कृपाया आम्हाला द्या की, जेणे करून बँकेची वसूली हाईल. ते म्हणाले की, आपल्या बँकेच्या ठेवी रू. १५५ कोटीच्या आहेत आणि यापैकी रू.१०५ कोटीच्या ठेवी निवृत्त झालेल्या सभासदांच्या आहेत. तरी आज त्यांनी ठेवलेल्या रक्कमेतुनच



INCOME-TAX DEPT. CO-OP. BANK LTD. ★ MUMBAI

आपण सभासदांना कर्ज देत आहोत. तरी या निवृत्त सभासदांचे मी मनापासून आभार व्यक्त करतो असे त्यानी सांगितले. ते पुढे म्हणाले की, आपण आता १०० व्या वर्षात वाटचाल करित आहोत तरी उपस्थित सभासदांपैकी जे सभासद निवृत्त होणार आहेत त्यांनी सुध्दा बँकेवर विश्वास दाखवावा आणि त्यांच्या ठेवी आपल्या बँकेमध्ये ठेवाव्यात अशी त्यांनी विनंती केली. तसेच या शतक महोत्सवाच्या कार्यक्रमा संदर्भात आपल्या काही सुचना असतील तर सभासदांनी त्या आम्हाला आणून द्याव्यात त्यावर आम्ही निश्चित विचार करू आणि त्यावेळी जे संचालक मंडळ असेल ते निश्चितच आपला शतकोत्सव सोहळा चांगल्या प्रकारे साजरा करतील असे सागून त्यानी त्यांच्या भाषणाचा समारोप केला.

**त्यानंतर सभेचे अध्यक्ष श्री. शीतल तळपदे यांनी आपले मनोगत सादर केले.** त्यानी सर्वप्रथम उपस्थित सर्व सभासदाचे आणि बँकेचे पदसिध्द अध्यक्ष याचे त्यांच्या मर्गदर्शनाबद्दल आभार मानले त्यानंतर त्यांनी आर्थिक वर्ष २०२३–२४ मधील बँकेच्या नेत्रदिपक प्रगतीबद्दल बँकेचे संचालक मंडळ आणि कर्मचाऱ्यांचे अभिनदन केले. त्यांनी असे सांगितले की, सभेमध्ये उपस्थित असलेल्या सभासदांनी आपल्या बँकेचा अहवाल वाचला असेलच "विना सहकार नाही उध्दार" या सुप्रसिध्द वाक्याचा आदर्श डोळ्यासमोर ठेऊन आपल्या बँकेच्या संस्थापकांनी आपल्या बँकेची स्थापना केली. त्यांनी सांगितले की, आपल्या बँकेच्या संचालकांनी सहकार खाते आणि भारतीय रिझर्व बँकेच्या नियमानूसार आपल्या बँकेची वाटचाल सूरू ठेवली आहे. आपले कसब पणाला लावून बँकेचे संचालक मंडळ आणि कर्मचारी वर्ग बँकेची प्रगती करीत आहेत. त्याबद्दल मी या सर्वांचे अभिनंदन करतो असे सांगुन ही सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडेल आणि सभासदांकडून आम्हाला मोलिक सुचना प्राप्त होतील अशी आशा व्यक्त करून त्यांनी त्याचे मनोगत संपविले.

**त्यानंतर सभेच्या प्रत्यक्ष कामकाजाला सुरूवात करण्यापूर्वी आपल्यातुन जे सभासद दिवंगत झालेले सभासद आहेत त्यांना आपण सर्व मिळून दोन मिनिट श्रध्दांजली अपर्ण करूया अशी सुत्रसंचालक श्री. प्रमोद वाघे यांनी सभागृहाला विनंती केली. त्यानूसार सर्वानी दोन मिनिटे उभे राहुन श्रध्दांजली अपर्ण केली.**

**त्यानंतर सभेचे अध्यक्ष मा. श्री. शीतल तळपदे यांनी बँकेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सभेच्या नोटीसीचे वाचन करण्याची विनंती केली. यावेळी मा. सभासद श्री. राजेंद्र गवस (सभासद क्र. ११२६) यांनी सांगितले की,** आजचा दिवस सभासदांचा असतो तरी आज आपल्या ज्या काही सुचना किंवा प्रश्न असतील ते मांडा आणि जो पर्यंत आपल्या प्रश्नांचे समाधानकारक उत्तर मिळत नाही तो पर्यंत या सभेचे कामकाज सुरू राहिल. ते पुढे म्हणाले की, आजही मागच्या वर्षाप्रमाणे बाहेर गोंधळ सुरू आहे. यामध्ये आम्ही पुढच्या वर्षी सुधारणा करू असे आपण सांगितले होते. परंतु काही फरक झालेला नाही. त्यानंतर त्यांनी विचारणा केली की आपण किती फॉर्म छापले आहेत आणि किती कुपन छापले आहेत याची माहिती द्यावी.

**यावर सभेच्या अध्यक्षांनी सांगितले की,** आपण हा विषय सभासदांच्या प्रश्नोत्तराच्या वेळीस घेऊया व आता विषय पत्रिके प्रमाणे विषय घेऊया **यावर सभासद श्री. प्रमोद दाहाट (सभासद क्र – ६२५०) यांनी सांगितले की,** आजची मिटिंग जरी आज पूर्ण झाली नाही तरीही कायद्यामध्ये तरतूद आहे की, सभा आपण पुढे ढकलू शकतो. तरी इतिवृत्तात नमूद करा की, ही सभा कितीही वेळ झाला तरी चालु राहिल.

**त्यानंतर सभेच्या अध्यक्षांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सभेच्या सुचनेचे वाचन करण्याची विनंती केली.** त्यानूसार त्यांनी सभेच्या सूचनेचे वाचन केले व त्यानंतर त्यांनी अहवालातील मुद्रणदोषाची खालील प्रमाणे माहिती दिली.



INCOME-TAX DEPT. CO-OP. BANK LTD. * MUMBAI *

**१८ व्या अधिमंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक २९.०८.२०२४ चे इतिवृत्त**

१. पहिल्या पनावर विषेश सुचनेमध्ये दि. २६.०८.२०२४ अशी जी तारीख दिली आहे. ती २३.०८.२०२४ अशी वाचावी.
२. पान क्रमांक ३ वर उपकार्याध्यक्षाच्या मनोगतामध्ये दि. २९.०८.२०१४ अशी जी तारीख दिली आहे. ती २९.०८.२०२४ अशी वाचावी.
३. पान क्रमांक २२ वर वसूल भागभांडवल ३,४८,३२४ असे दिलेले आहे त्या ऐवजी जो खालचा फिगर आहे ३,३३,६२३ तो वाचावा.
४. पान क्रमांक ६४ वरील-उपविधीदुरूस्ती मधील दुसऱ्या कॉलममध्ये Two Times हा शब्द वगळावा.

**यावर सभासद श्री. प्रमोद दाह्याट यांनी सांगितले की,** १७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये सभेस अनूपस्थित असलेल्या सभासदांची अनूपस्थिती क्षमापीत करणे हा विषय नव्हता. तरी आताच्या विषय पत्रिकेमध्ये १७ व्या आणि १८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये सभेस अनूपस्थित असलेल्या सभासदांची अनूपस्थिती क्षमापीत करणे अशा विषय घ्यावा असे त्यांनी सांगितले असता ते सर्वानूमते मान्य करण्यात आले.

त्यानंतर विषय पत्रिकेनूसार सभेच्या कामकाजास सुरूवात करण्यात आली.

**विषय क्र १:– दि. १४.०९.२०२३ रोजी झालेल्या १७ व्या अधिमंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्तांत वाचून मंजूर करणे.**

**सभेचे अध्यक्ष श्री. शीतल तळपदे यांनी सभागृहास असे सूचित केले की,** बँकेच्या १७ व्या अधिमंडळाच्या वार्षिक बैठकीच्या इतिवृत्ताचे वाचन बँकेचे मा. संचालक श्री. एकनाथ अभंग, संचालक, श्री. राजेश मुंज, संचालक श्री. संग्राम मुंडे व संचालक श्री. संजय कांबळे करतील. तसेच त्यांनी सभागृहाला विचारणा केली की, इतिवृत्त सर्वांना वितरीत करण्यात आली आहे त्यामुळे इतिवृत्ताचे वाचन झाले असे समजून सभेची पुढील कार्यवाही करायची की इतिवृत्ताचे वाचन सभागृहापुढे करायचे. यावर सभागृहाने इतिवृत्ताचे वाचन करण्यात यावे असे सांगितले असता सभेमध्ये इतिवृत्ताचे वाचन करण्यात आले. त्यानंतर सभेच्या अध्यक्षांनी सदर इतिवृत्ता संदर्भात कोणाला काही दुरूस्ती सुचवावयाची आहे का? अशी विचारणा केली.

**यावर मा. सभासद श्री. राजेंद्र गवस (सभासद क्र – ११२६) यांनी सांगितले** की ठराव क्र.१० मध्ये सुचक म्हणून श्री. रूपेश आंबेकर आणि अनुमोदक म्हणून श्री. राजेंद्र गवस होते येथे तुम्ही अनुमोदक म्हणून श्री. सोपान जाधव याचे नाव लिहले आहे. तरी या चुकीची दुरूस्ती करण्यात यावी.

त्यांनी पुढे सांगितले की, इतिवृत्तात असे लिहीले आहे की, इतिवृत्तात श्री. राजेंद्र गवस यांनी अध्यक्षांच्या परवांगीने मंचावर येऊन मनोगत व्यक्त केले. तरी मी मनोगत व्यक्त केले नाही तर प्रश्न मांडले आणि मी जे प्रश्न मांडले ते या इतिवृत्तामध्ये नमूद करण्यात आलेले नाही. त्यामुळे या इतिवृत्ताला माझा विरोध आहे असे त्यांनी सांगितले.

त्यांनी पुढे सांगितले की, मी आपल्या बँकेच्या कर्मचाऱ्यांबद्दलही बोललो होतो. अगोदर जे काही कर्मचारी होते ते का सोडून गेले कशाप्रकारे सोडून गेले आणि आता जे कर्मचारी आहेत त्यांना काय त्रास होत आहे. त्यावेळी बेसेकर साहेबांनी सांगितले होते की, या संबंधी आम्ही विचारविनिमय करून योग्य तो तोडगा काढुन ते अदयाप मला कळविण्यात आलेले नाही.

INCOME-TAX DEPT. CO-OP. BANK LTD. * MUMBAI *

माझा चौथा प्रश्न होता की, जे बँकेचे कर्मचारी आहेत ते सध्या मानसीक तनावाखाली काम करित आहेत. त्यांना वरिष्ठ अधिकाऱ्यांचा त्रास.होतो आहे. तरी ते आता तसा त्रास देणार नाही आणि संचालक मंडळ ही यामध्ये हस्तक्षेप करणार नाही असे बेसेकर साहेब यांनी सांगितले होते. त्याचप्रमाणे जी काही नविन भरती झाली ते नविन कर्मचारीही तनावाखाली काम करीत आहेत त्यांनाही वरिष्ठ अधिकाऱ्यांचा त्रास होत आहे. या कर्मचाऱ्यांच्या मी व्यथा मांडल्या.

त्याच प्रमाणे माझा सहावा प्रश्न होता बँकेच्या स्टेशनरी संदर्भातील निविदा. तरी या निविदा काढण्यात आल्या होत्या का? असा प्रश्न मी विचारला होता. त्यावेळी बेसेकर साहेबांनी सांगितले होते की, निविदा काढण्यात आल्या होत्या.

मी याची व्हिडिओ रेकॉडिंग मागितली होती. त्यावेळेला मला कायद्याच्या तरतूदी सांगण्यात आल्या. त्यानंतर मी बँकेत जाऊन चार तास ही व्हिडिओ रेकॉडिंग पाहिली त्यावेळी मला ज्या तृटी आढळुन आल्या त्याची ही मी नोंद घेतली आहे. बेसेकर साहेबांनी सांगितले होते की, निविदा मागविण्यात आल्या होत्या त्या मी मागितल्या असता मला देण्यात आल्या नाही. मला कायद्याच्या तरतूदी सांगण्यात आल्या.

मी २८.०२.२०२४ ला पत्र दिले होते की मला १७ व्या वर्षीक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त आणि व्हिडिओ रेकॉडिंग देण्यात यावे परतु मला त्याचे उत्तर देण्यात आले नाही. त्यानंतर मी दोन स्मरण पत्र दिले. मी इतिवृत्तासाठी पैसे भरण्यास तयार आहे असेही सागितले. त्यावेळेस मला सांगण्यात आले. महाराष्ट्र नियम १९६१ मधिल नियम क्र. २७/३० मध्ये स्पष्टता नसल्याने व्हिडिओ रेकॉडिंग देता येणार नाही. असे कळवून ज्यावेळी तुम्हाला वेळ मिळेल तेव्हा तुम्ही पाहू शकता असे सांगण्यात आले.

त्यानूसार मी जेव्हा व्हिडिओ रेकॉडिंग बघितली तेव्हा माझ्या निदर्शनास आले की, आपले सभासद श्री. रमेश गावडे यांनी सुध्दा व्हिडिओ रेकॉडिंगची मागणी केली होती. त्यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी सांगतात की, सभेचे रेकॉडिंग आणि आवाज बरोबर नसल्याने ती तुम्हाला कशी देऊ. तरी सगळ्यांनी विचार करा की, मला कायद्याचे कलम दाखवून सुस्पष्टता नाही असे सांगतात आणि गावडे यांना रेकॉडिंग आणि आवाज बरोबर नाही त्यामुळे ती कशी देऊ असे सांगतात. तरी याचा सभासदांनी विचार करावा असे त्यांनी सांगितले. ते पुढे म्हणाले की मी माझ्या पत्राच्या प्रती को ऑप बँक एम्प्लॉईज युनियनचे श्री. नरेंद्र सावंत यांना सुध्दा दिल्या त्या सर्वांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे बोट दाखविले आहे.

**यावर सभेचे अध्यक्ष श्री. शीतल तळपदे यांनी सांगितले की,** जे सभासद सेभेला उपस्थित नाहीत त्यांचे नाव घेऊन त्यांच्यावतीने कृपया बोलु नये. **यावर मा. सभासद श्री. राजेंद्र गवस यांनी सांगितले की,** मी श्री. रमेश गावडे यांच्या वतीने बोलत नसून त्यांना दिलेले उत्तर आणि मला दिलेले उत्तर यामध्ये जी तफावत आहे ती मांडत आहे.

श्री. राजेंद्र गवस यांच्या प्रश्नावर मा. उपकार्याध्यक्ष श्री. सदिप आबोकर यांनी सांगितले की, आपण आता जे काही मुद्दे उपस्थित केले आहे ते त्यामध्ये बऱ्याच गोष्टी आहेत की, कोण काय म्हणाला त्याच उत्तर आम्ही तुम्हाला आत्ताच देऊ शकत नाही. चित्रीकरणाबाबत त्यांनी सांगितले की, आज तुम्ही चित्रीकरण मागितले उद्या आणखी कोणी मागेल आणि त्यात फेरफार करण्याची शक्यता आहे. त्यामुळे आम्ही चित्रीकरण दिले नाही परंतु ते दाखवायला आम्हाला काहीच अडचण नाही त्यामुळे तुम्हाला ते दाखविण्यात आले आहे.

INCOME-TAX DEPT. CO-OP. BANK LTD. * MUMBAI *

कर्मचाऱ्याच्या बाबतीत त्यांनी सांगितले की, बेसेकर साहेबांनी संचालक मंडळाचा राजिनामा दिल्यानंतर मी स्वतः कर्मचाऱ्याची बैठक घेतली होती आणि त्याना काही तनाव आहे का ? अशी विचारणा केली होती. ते म्हणाले की, संचालक मंडळाचे कर्मचाऱ्याबरोबर अतिशय चांगले संबध आहेत. तरी तुमचा जो काही आक्षेप आहे तो कासा काय सिध्द करणार तुम्हाला कर्मचाऱ्यांनी काही वेगळे सांगितले आहे आणि मला काही वेगळे सांगितले आहे त्यामध्ये खरे काय आणि खोटे काय? हे कसे ठरविणार. आम्ही कर्मचाऱ्यासाठी जेव्हडे चांगले करता येईल ते करण्याचा प्रयत्न करतो आणि त्यासाठी सर्व सांचालक मडळ कटीबध्द आहे.

**यावर श्री. राजेंद्र गवस यांनी सांगितले की,** मिटींगमध्ये मी मुद्दे मांडल्यानंतर जे वरिष्ठ अधिकारी आहेत त्यांनी त्यांच्या वर्तणूकीत फरक केला आणि त्यानंतर तुम्ही सभा घेतली. तरी माझा मुद्दा आहे की, मी जे काही प्रश्न माडले होते ते इतिवृत्तात आलेले नाहीत हा माझा आक्षेप आहे.

यावर मा. मा. उपकार्याध्यक्ष श्री. संदिप आंबोकर यांनी सांगितले की, इतिवृत्तात जरी आपले मुद्दे आले नसले तरी सुध्दा आम्ही त्याच्या वर कार्यवाही केली आहे आणि त्यावर तोडगा काढला आहे.

**सभासद श्री. विजय झगडे सभासद क्र ६६०८ यांनी सांगितले की,** प्रत्येक वर्षी आपण अशा प्रकारे इतिवृत्तावर बराच वेळ चर्चा करतो त्यामुळे बरेच सभासद निघुन जातात. जर आपण इतिवृत्त आगोदरच प्रसिध्द करतो तर ज्यांना इतिवृत्तामध्ये काही त्रृटी आढळल्या तर त्यांनी बँकेला आगोदरच कळवावे आणि संचालक मंडळाने त्याचे उत्तर आगोदरच तयार ठेवावे असे सुचना त्यांनी मांडली. यावर मा. उपाध्यक्ष यांनी पुढच्या वेळेस आम्ही यावर नक्की विचार करू अशी सांगितले. त्यानंतर त्यांनी वार्षिक सर्वसाधारण सभा सकाळी १० वाजता घ्यावी अशी ही सुचना मांडली. यावर मा. उपाध्यक्ष यांनी सांगितले की, या वर्षी आपल्याला सभागृह मिळायला सुध्दा वेळ झाला दोन वाजे पर्यत आधीचाच कार्यक्रम सुरू होता.

**सभासद श्री. रूपेश आंबेकर (सभासद क्र. –७२७१) यांनी सांगितले की,** श्री. अजित जाधव याना वेळोवेळी बढती दिली त्यांचा पगार दुप्पट केला. हा विषय मी गेली तीन चार वर्ष सभेपुढे मांडत आहे. मागिल सभेमध्ये मी इतर बँकेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या पगाराची माहिती घेऊन ती सभेपुढे मांडली आणि इतर बँकांमध्ये मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना रू. १.१० लाख इतका पगार असताना आपल्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना रू.१.४५ लाख इतका पगार का दिला जातो अशी मी विचारणा केली होती असे असताना ही आपण हा विषय सभे पुढे का घेत नाही अशी त्यांनी विचारणा केली आणि सांगितले की, त्यामुळे मी यावर्षी लेखी पत्र दिले आहे की, जेणे करून आपण माझ्या प्रश्नाचे उत्तरे दयाल. त्यानंतर त्यांनी सांगितले की, तुमचे अहवाल छापुन २२ तारखेला मिळाले आणि २३ तारखे पर्यत तुम्ही सभासदांकडून अहवालावर लेखी सुचना मागवता तसेच बोर्डावर लावलेल्या नोटीसमध्ये २३ तारीख लिहीता आणि अहवालामध्ये २६ तारीख छापता याबाबत खुलासा करावा असे त्यांनी सांगितले.

ते पुढे म्हणाले की, खेळीमेळीच्या वातावरणात काम व्हावे असे आपण म्हणता तर मग सभासदांशी गैरवरतवणूक करू नका, प्रत्येक वेळी सभासदांना नियम दाखवू नका म्हणजे मग सभासद ही तुम्हाला साथ देतील असे त्यांनी सांगितले. त्यानंतर त्यांनी नविन मुख्य कार्यकारी अधिकारी यांची नियुक्ती अदयाप का झाली नाही याबाबत त्यांच्या दि. ०६.०६.२०२४ रोजीच्या पत्राबाबत ही विचारणा केली.

INCOME-TAX DEPT. CO.OP. BANK LTD. * MUMBAI *

## १८ व्या अधिमंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक २९.०८.२०२४ चे इतिवृत्त

**मा. सभासद श्री. प्रमोद दाहाट यांनी सांगितले की,** इतिवृत्तात काय दुरूस्ती केली आणि विषय कोणता होता हे इतिवृत्तात नमूद करा. इतिवृत्तामध्ये शेवटच्या पानावर १४ सप्टेंबर २०२३ अशी तारिख टाकली आहे तरी त्या ठिकाणी इतिवृत्त ज्या दिवशी कायम केले ती तारीख टाकण्यात यावी. त्यांनी पुढे सांगितले की, बँकेच्या पदसिध्द अध्यक्षा श्रीमती कृष्णन मॅडम यांचा संदेश उपकार्याध्यक्ष यांनी वाचला होता तो इतिवृत्तात नमूद करा. मुद्रनदोषाबद्दल मुख्य कार्यकारी अधिकारी यानी सभागृहाला माहिती देताना असे नमूद करा. सभासदानी जी चर्चा केली त्यांचा सभासद क्रमांक टाकण्यात यावा. पान क्रमांक ११ वर मी बँकेमध्ये संचालक मंडळामध्ये किती पदे रिक्त आहेत आणि त्याबाबत बँकेने मा. सहकार आयुक्त यांच्याकडे काय पत्रव्यवहार केला व त्याच्याकडून बँकेला काय उत्तर मिळाले तसेच अशी रिक्त पदे भरण्यासाठी काय कार्यवाही करावी लागते असा प्रश्न मा. बेसेकर साहेब यांना मी विचारला होता यावर मला उत्तर देण्यात आले होते. तरी तो प्रश्न आणि त्यावर मला दिलेले उत्तर इतिवृत्तामध्ये टाकण्यात यावे. अत्यंत महत्वाचे म्हणजे या अधिमंडळाच्या बैठकीसाठी मी अभिनदनाचा ठराव घेतला होता तो ठराव इतिवृत्तात नमूद करण्यात आलेला नाही. त्याचप्रमाणे अधिमंडळची वार्षिक सर्वसाधारण सभा असा शब्द आहे तिथे अधिमंडळाची वार्षिक सर्वसाधारण बैठक असे नमूद करावे.

**त्यानंतर सभेचे अध्यक्ष मा. श्री. शीतल तळपदे यांनी** १७ व्या अधिमंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्त मजूरीचा ठराव मांडला व त्यास सभागृहाने सुचविलेल्या दुरूस्तीसह मजूरी देण्यात आली. त्यानूसार सर्वानुमते खालील प्रमाणे ठराव संमत करण्यात आला.

**ठराव क्र १:**

**आज गुरूवार, दिनांक २९ ऑगस्ट, २०२४ रोजी आयोजित करण्यात आलेली इन्कम टॅक्स डिपार्टमेंट को–ऑप. बँक लि. या बँकेची १८ वी अधिमंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा असा ठराव करीत आहे की, दिनांक १४ सप्टेंबर २०२३ रोजी झालेल्या १७ व्या अधिमंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत ही सभा मंजूर करीत आहे.**

**सुचक : श्री. क्रिष्णा गोडसे**
**अनुमोदकः श्री. अंकुश भारगुडे**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

**या नंतर मा. सभासद श्री. प्रमोद दाहाट यांनी असे सांगितले की,** सभागृहाची जर मंजुरी असेल तर ही सभा पुढे चालवावी आणि त्यानंतर उपस्थित सभासदांनी सभा पुढे सुरु ठेवण्यास सर्वानुमते मंजुरी दिली आणि त्या नंतर या सभेचे कामकाज पुढे सुरु राहील असे सभेचे अध्यक्ष मा. श्री शीतल तळपदे यांनी सांगितले व त्यानुसार सभेचे कामकाज पुढे सुरु करण्यात आले.

**विषय क्र. २:– दि. ३१ मार्च, २०२४ रोजी संपलेल्या सहकार वर्षाचा संचालक मंडळाने तयार केलेला अहवाल, अंतर्गत व संविधानिक लेखापरिक्षकांनी तपासलेले ताळेबंद व नफा–तोटा पत्रके स्विकृत करणे.**

सदर विषय चर्चेला घेतांना सभेचे अध्यक्ष श्री. शीतल तळपदे यांनी सुचनेनूसार विषय क्र. २ सभागृहापुढे मांडला आणि या विषया संदर्भात कोणाला काही सुचना करावयाच्या आहे का अशी विचारणा केली. **यावर सभासद श्री.**



INCOME-TAX DEPT. CO-OP. BANK LTD. * MUMBAI * SEAL

**१८ व्या अधिमंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक २९.०८.२०२४ चे इतिवृत्त**

**राजेंद्र गवस यांनी सांगितले की,** पान क्र. २४ मध्ये आपण अदर टँजीबल सिक्युरिटीमध्ये दोन कोटी इतकी रक्कम दाखवली आणि परत खाली ब मध्ये दोन कोटी रूपये दाखवले आहेत. पान क्र. ३३ मध्ये बॉरोईंग जास्वदी दोन कोटी दाखवले आहेत. तरी याचा एकमेकाशी काय संबंध आहे याचे स्पष्टीकरण द्यावे अशी विचारणा त्यांनी केली.

**यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असे सांगितले की,** मार्च महिन्यामध्ये शासकीय कर्मचाऱ्यांचे वेतन एप्रिल महिन्यात देण्यात येते. अशावेळी सभासदांच्या कर्जाची मागणी पूर्ण करण्यासाठी निधीची आवश्यक्ता भासते तसेच भारतीय रिझर्व बँकेच्या नियमानूसार एनडीटीएलच्या ४.५०% इतका कॅश रिझर्व राखवा लागतो. या आकस्मिक तरतूदीसाठी बँकेने सरकारी रोख्यावर एमएससी बँकेमार्फत जास्वंदी नावाच्या योजनेअंतर्गत ओव्हर ड्राफ्ट मर्यादा मंजुर करून ठेवली आहे. मार्च महिन्याच्या अखेरीस वरिल प्रमाणे निधीची आवश्यकता भासल्याने तीन चार दिवसासाठी आपण रू. दोन कोटी इतक्या रक्कमेचा ओव्हर ड्राफ्ट घेतला होता व आयकर कार्मचाऱ्यांचे पगार जमा झाल्यावर लगेच आपण तो भरून टाकला. त्यामुळे पान क्र. २४ वर शॉर्ट टर्म कर्जामध्ये आपल्याला सरकारी रोख्याच्या तारणावर रू. दोन कोटी इतकी कर्जाची रक्कम दिसत आहे. त्याच प्रमाणे हीच रक्कम त्याच पानावर खाली बाहेरच्या कॉलममध्ये, घेण्यात आलेली आहे आणि याचे ताळेबंदाचे शेड्युल म्हणून पान क्र. ३३ वर बॉरोईग (जास्वंदी) म्हणून दाखवले आहेत. **त्यानंतर सभेचे अध्यक्ष मा. श्री. शीतल तळपदे यांनी सदर विषयाशी संबंधीत ठराव सभागृहासमोर मंजूरीकरीता ठेवला असता.** अंतर्गत व वैधानिक लेखापरिक्षकांनी तपासलेले ताळेबंद व नफातोटा पत्रक यास मा. संचालक मंडळाने मंजूरी दिली असल्याने ते स्विकृत करण्याबाबत सर्वानुमते ठरविण्यात आले व त्यानूसार खालील प्रमाणे ठराव संमत करण्यात आला.

<u>ठराव क्र २:</u>

**आज गुरूवार, दिनांक २९ ऑगस्ट, २०२४ रोजी आयोजित करण्यात आलेली इन्कम टॅक्स डिपार्टमेंट को–ऑप. बँक लि. या बँकेची १८ वी अधिमंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा असा ठराव करीत आहे कि, दिनांक ३१ मार्च २०२४ रोजी संपलेल्या सहकार वर्षाचा संचालक मंडळाने तयार केलेला अहवाल, अंतर्गत व संविधानिक लेखापरिक्षकांनी तपासलेला ताळेबंद व नफा–पत्रक ही सभा स्विकृत करीत आहे.**

**सुचक :– श्री. विजय झगडे**

**अनूमोदक :– श्री. प्रमोद दाहाट**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**विषय क्र ३ :– सन २०२३–२४ या सहकार वर्षामध्ये बँकेला झालेल्या नफा विभागणी संबंधी संचालक मंडळाने केलेल्या शिफारशींचा विचार करून मंजूरी देणे व लाभांश जाहिर करणे.**

या संदर्भात सभेचे अध्यक्ष मा. श्री. शीतल तळपदे साहेब यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी याना सदर विषय क्र. ३ चे वाचन करण्यास सागितले. त्यानूसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदर विषयाचे वाचन केले आणि नफा विभागणीबाबतची माहिती अहवालात पान क्र. ८ वर छापन्यात आली आहे अशी माहिती सभागृहाला दिली. त्यानंतर



INCOME-TAX DEPT. CO-OP. BANK LTD. * MUMBAI *

## १८ व्या अधिमंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक २९.०८.२०२४ चे इतिवृत्त

सभेचे अध्यक्ष मा. श्री. शीतल तळपदे यानी या विषया संदर्भात कोणाला काही सुचना करावयाच्या आहे का अशी विचारणा केली. **यावर मा. सभासद श्री. रूपेश आंबेकर यांनी सागितले की,** शतक मोहत्सव निधी रू. ४ लाख दाखवला आहे तीथे मागिल जमा निधी रू. ५० लाख ब्रॅकेटमध्ये दाखवावा अशी सुचना त्यांनी केली यावर मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यानी नफा विभागणीमध्ये यावर्षीचीच आकडेवारी दाखवण्याची पध्दत आहे. त्यामुळे तसे दाखवले आहे आणि आता पर्यंतचा जमा शतक मोहत्सव निधी पान क्र २२ वर ३१.०३.२०२४ च्या ताळबंदमध्ये दाखवला आहे असे सांगितले. तरीही श्री. रूपेश आंबेकर यांनी मागिल राखीव निधीची माहिती या वर्षीच्या नफा विभागणीमध्ये दाखवावी अशी त्यांनी सुचना केली व त्यांच्या सूचनेची नोंद घेण्यात येत आहे असे सभेच्या अध्यक्षांनी सांगितले. **त्यानंतर सभेचे अध्यक्ष मा. श्री. शीतल तळपदे यांनी सदर विषयाशी संबंधीत ठराव सभागृहासमोर मंजूरीकरीतां ठेवला असता.** सन २०२३–२४ या सहकार वर्षामध्ये बँकेला झालेल्या नफा विभागणी संबधी संचालक मंडळाने केलेल्या शिफारशीनूसार मंजूरी देणे व लाभांश जाहिर करण्यातबाबतचा ठराव सर्वा नुमते खालील प्रमाणे संमत करण्यात आला.

**<u>ठराव क्र –३</u>**

**आज गुरूवार, दिनांक २९ ऑगस्ट, २०२४ रोजी आयोजित करण्यात आलेली इन्कम टॅक्स डिपार्टमेंट को–ऑप. बँक लि. या बँकेची १८ वी अधिमंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा असा ठराव करीत आहे कि, संचालक मंडळाने शिफारस केल्याप्रमाणे मागील वर्षाचा शिल्लक नफा रू. ५,२९३.७३ व अहवाल साली झालेला नफा रू. ९९,१४,४०६.१४ मिळून रू. ९९,१९,६९९.८७ एवढया एकूण नफ्याच्या विभागणीस खालीलप्रमाणे ही सभा मंजूरी देत आहे.**

| तपशिल | रूपये |
|---|---|
| राखीव निधी (नफ्याच्या २५%) | रू.२२,७९,९२५.०० |
| लाभांश १५% | रू.४८,३२,४४५.०० |
| विकास निधी | रू.५,००,०००.०० |
| सर्वसाधारण निधी | रू.५,००,०००.०० |
| सभासद कल्याण निधी | रू.२,००,०००.०० |
| लभांश समानीकरण निधी २% | रू. २,८७,६३७.०० |
| सार्वजनिक निधी | रू. २५,०००.०० |
| शिक्षण निधी १% | रू. ९९,२००.०० |
| शतक महोत्सव निधी | रू. ४,००,०००.०० |
| शिल्लक नफा | रू. ३४९२.८७ |
| एकूण | रू. ९९,१९,६९९.८७ |

**सुचक :– श्री. गिरीश राऊत**
**अनुमोदक :– श्री. संजय चव्हाण**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

**विषय क्र ४:–सन २०२३–२४ सालाचा संविधानिक लेखापरिक्षण अहवाल आणि अंतर्गत हिशेब तपासनिसांचा अहवाल वाचून स्विकृत करणे.**

सभेचे अध्यक्ष श्री. शीतल तळपदे यांनी सदर विषय आणि ठराव सभागृहासमोर मंजूरीसाठी सादर केला असता. त्यावर विचार विनिमय करून सन २०२३–२४ या वर्षाचा संविधानिक लेखापरिक्षण अहवाल आणि सन २०२३–२४ चा अंतर्गत हिशेब तपासनिसांचा अहवाल वाचून स्विकृत करण्यास सभागृहाने सार्वानूमते मंजूरी दिली. त्यानुसार खालील ठराव संमत करण्यात आला.

**ठराव क्र ४:**

**आज गुरूवार, दिनांक २९ ऑगस्ट, २०२४ रोजी आयोजित करण्यात आलेली इन्कम टॅक्स डिपार्टमेंट को–ऑप. बँक लि. या बँकेची ९८ वी अधिमंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा असा ठराव करीत आहे कि, सन २०२३–२४ या वर्षाचा संविधानिक लेखापरिक्षण अहवाल आणि अंतर्गत हिशेब तपासनिसांचा सादर करण्यात आलेल्या अहवालास ही सभा स्विकृती देत आहे.**

**सुचक : श्री. अनिल बाबुराव पाटील**
**अनुमोदकः श्री. हरिश जाधव**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

**विषय क्र ५:– सन २०२५–२६ सालासाठी अंतर्गत हिशेब तपासणीसाठी लेखापरिक्षकांची नेमणूक करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.**

सभेचे अध्यक्ष श्री. शीतल तळपदे यांनी सदर विषय आणि ठराव सभागृहासमोर मंजूरीसाठी सादर केला असता. **मा. सभासद श्री. राजेंद्र गवस यांनी विचारणा केली की,** अंतर्गत लेखापरिक्षक तेच आहेत की, बदलण्यात आले आहेत. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले की, या वर्षी लेखापरिक्षक बदलुन समावर्ती लेखापरिक्षकांची नेमणूक करण्यात आली आहे. त्यानंतर अधिमंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेने सन २०२५–२६ सालासाठी अंतर्गत हिशेब तपासणीसाठी लेखापरिक्षकांची नेमणूक करण्यास व त्यांचा मेहनताना ठरविण्यास मा. संचालक मंडळास अधिकार प्रदान केले व त्यानुसार खालीलप्रमाणे ठराव सर्वानुमते संमत करण्यात आला.

INCOME-TAX DEPT. CO-OP. BANK LTD. * MUMBAI *

**ठराव क्र ५:**

**आज गुरूवार, दिनांक २९ ऑगस्ट, २०२४ रोजी आयोजित करण्यात आलेली इन्कम टॅक्स डिपार्टमेंट को–ऑप. बँक लि. या बँकेची ९८ वी अधिमंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा असा ठराव करीत आहे कि, सन २०२५–२६ सालासाठी अंतर्गत हिशेब तपासणीसाठी लेखापरिक्षकांची नेमणूक करणे व त्यांचा मेहनताना ठरविण्याबाबत ही सभा माननीय संचालक मंडळास अधिकार प्रदान करीत आहे.**

**सुचक : श्री. विजय झगडे**
**अनुमोदक: श्री. प्रभाकर झगडे**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

**विषय क्र ६:–भारतीय रिझर्व बँकेने दिनांक २७.०४.२०२१ च्या परिपत्रकान्वये दिलेल्या निर्देशानुसार आर्थिक वर्ष २०२४–२५ साठी वैधानिक लेखापरीक्षकांची नेमणूक करणेबाबत माननीय संचालक मंडळाने शिफारस केलेल्या वैधानिक लेखापरिक्षकांच्या नेमणूकीस कार्योत्तर मंजूरी देणे.**

सभेचे अध्यक्ष श्री. शीतल तळपदे यांनी सदर विषय आणि ठराव सभागृहासमोर मंजूरीसाठी सादर केला आणि **या विषयाबाबतची माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सभागृहास देण्यास सांगितले.** या संदर्भात मुख्य कार्य कारी अधिकारी यांनी सांगितले की लेखापरिक्षकांच्या नियुक्तीसाठी भारतीय रिझर्व बँकेकडे प्रस्ताव पाठवावा लागतो तरी मागिल वर्षीचे वैधानिक लेखापरिक्षण मे. साज अँण्ड असोसिएटस् , चार्टर्ड आकाऊंटट याच्याच नावाचा प्रस्ताव याही वर्षी पाठविण्यात आला होता त्याला भारतीय रिझर्व बँकेने मंजुरी दिली आहे तरी संचालक मडळाच्या प्रस्तावास आपण कार्योत्तर मंजुरी द्यावी अशी विनंती केली. **यावर मा. श्री. राजेंद्र गवस यांनी असे विचारले की** मे. साज अँण्ड असोसिएटस् , चार्टर्ड आकाऊंटट यांची आपण किती वर्ष वैधानिक लेखापरिक्षक म्हणून नेमणूक करू शकतो. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले की, आपण त्यांची सलग ३ वर्ष नेमणूक करू शकतो व हे त्याचे तीसरे व शेवटचे वर्ष आहे. त्यावर विचार विनिमय करून आर्थिक वर्ष २०२४–२५ सालाकरीता वैधानिक लेखापरिक्षक म्हणून मे. साज अँण्ड असोसिएटस्, चार्टर्ड आकाऊंटट याच्या नेमणूकीबाबतच्या भारतीय रिझर्व बँकेकडे पाठवलेल्या प्रस्तावास सर्वानुमते कार्योत्तर मंजूरी देण्यात आली. त्यानुसार खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यात आला.

**ठराव क्र ६:–**

**आज गुरूवार, दिनांक २९ ऑगस्ट, २०२४ रोजी आयोजित करण्यात आलेली इन्कम टॅक्स डिपार्टमेंट को–ऑप. बँक लि. या बँकेची ९८ वी अधिमंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा असा ठराव करीत आहे कि, भारतीय रिझर्व्ह बँकेने दिनांक २७.०४.२०२१ च्या परिपत्रकान्वये दिलेल्या निर्देशानुसार आर्थिक वर्ष २०२४–२५ साठी वैधानिक लेखापरीक्षकाची नेमणूक करणेबाबत शासनाने निश्चित केलेल्या वैधानिक लेखापरिक्षकांच्या नामतालिकेमधून मे. साज अँण्ड असोसिएटस् , चार्टर्ड आकाऊंटट यांची वैधानिक लेखापरिक्षक म्हणून नेमणूक करणेबाबत भारतीय रिझर्व बँकेस पाठविण्यात आलेल्या प्रस्तावास ही सभा कार्योत्तर मंजूरी देत आहे.**

**सुचक : श्री. रूपेश सदानंद आंबेकर**
**अनुमोदक: श्री. गिरिश बापू राऊत**
**ठराव सर्वानुमते मंजूर**



INCOME-TAX DEPT. CO-OP. BANK LTD. * MUMBAI *

**विषय क्र ७:– आर्थिक वर्ष २०२२–२३ च्या वैधानिक लेखापरिक्षणाच्या दोष दुरूस्ती अहवालास मंजूरी देणे.**
सदर विषय चर्चेला घेताना सभेचे अध्यक्ष श्री. शीतल तळपदे यांनी केलेल्या सुचनेनूसार **मा. संचालक श्री. परमानंद ठाकुर यांनी सदर विषया संबंधीत ठराव समागृहासमोर मंजूरीकरीता ठेवला** व आर्थिक वर्ष २०२२–२३ च्या वैधानिक लेखापरिक्षणाच्या दोष दुरूस्ती अहवालास मंजूरी देणेबाबत वार्षिक सर्वसाधारण सभेस विनती केली. बँकेने सन २०२२–२३ च्या वैधानिक दोष दुरूस्ती अहवालाबाबत कायदेशीर कार्यवाही पूर्ण केलेली असल्याने त्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली त्यानूसार खालील प्रमाणे ठराव संमत करण्यात आला.

**ठराव क्र ७:**

**आज गुरूवार, दिनांक २९ ऑगस्ट, २०२४ रोजी आयोजित करण्यात आलेली इन्कम टॅक्स डिपार्टमेंट को–ऑप. बँक लि. या बँकेची १८ वी अधिमंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा असा ठराव करीत आहे कि, आर्थिक वर्ष २०२२–२३ च्या वैधानिक लेखापरिक्षणाच्या दोष दुरूस्ती अहवालास ही सभा मंजूरी देत आहे.**

**सुचक : श्री. अंकुश मारगुडे**
**अनुमोदक: श्री. संदेश जाधव**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

**विषय क्र ८:– बँकेच्या सन २०२३–२४ च्या मंजूर अंदाजपत्रका पेक्षा बाबनिहाय जास्त झालेल्या खर्चास मंजूरी देणे तसेच सन २०२४–२५ चे उत्पन्न व खर्चाचे अंदाजपत्रकास मंजूरी देणे.**

या संदर्भात सभेचे अध्यक्ष श्री. शीतल तळपदे यांनी या विषया संदर्भातील सुचना मुख्य कार्यकारी अधिकारी याना वाचुन दाखविण्यास सांगितले त्यानूसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदरचा विषय वाचुन दाखवला आणि सांगितले की, पान क्र. ५८ वर सन २०२३– २४ चे अंदाजपत्रक व प्रत्यक्ष स्थिती तसेच २०२४–२५ चे अंदाज पत्रक दिलेले आहे. तरी आपण या अंदाज पत्रकास मंजुरी द्यावी अशी त्यांनी विनंती केले.

**या संदर्भात साभासद श्री. राजेंद्र गवस** यांनी अशी विचारणा केली की, डायरेक्टर सिटींग फी मध्ये आपण २०२३–२४ मध्ये रू.२.५० लाख इतका खर्चाचा अंदाज दिला होता आणि प्रत्यक्ष खर्च रू. ४.५९,०२०/– इतका झाला तरी हा जवळ जवळ दोन लाख इतका वाढीव खर्च का झाला आणि यावर्षी ५ लाख इतका खर्चाचा अंदाज दिला आहे याचे स्पष्टीकरण द्यावे अशी मागणी त्यांनी केली. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले की संचालक मंडळाला जो बैठक भत्ता दिला जातो त्यामध्ये महाराष्ट्र शासनाने दुरूस्ती करून वाढ केली आहे. पूर्वी जो रू.४७०/– इतका बैठक भत्ता दिला जायाचा तो रू. २ हजार प्रति बैठक इतका वाढवण्यात आला आहे. या दुरूस्ती ला सर्वसाधारण सभेची मंजुरी घेतली का ? असे श्री. राजेंद्र गवस यांनी विचारणा केली असता सदर दुरूस्ती महाराष्ट्र सहकारी कायद्यामध्ये झाली असून त्याला वार्षिक सर्वसाधारणे सभेच्या मंजुरीची आवश्यकता नाही असे त्यांनी सांगितले. यावर त्यांनी सांगितले की या वाढी बाबत अहवालात आपण स्पष्टीकरण दिले असते तर सभासदांना समजले असते.

**यावर मा. सभासद श्री. प्रमोद दाहात** यांनी सांगितले की, ज्या वळेस कायद्यामध्ये सुधारणा होते ती आपल्याला स्विकारावी लागते. या संदर्भात उपाध्यक्ष श्री. संदीप आंबोकर यांनी सांगितले की, सचालक मंडळाच्या दर



INCOME-TAX DEPT. CO-OP. BANK LTD. * MUMBAI *

महिन्याला दोन सभा होतात त्याचा भत्ता घेतला जातो मात्र या व्यतीरिक्त संचालक मंडळाच्या विविध उपसमित्या आहेत. त्यांच्या ही वेळोवेळी सभा होतात तरी या सभांचा भत्ता संचालक मंडळ घेत नाही अशी माहिती त्यानी दिली. सभासद श्री. प्रमोद दाहाट यांनी सांगितले की, आपण अंदाज पत्रकात सन २०२३–२४ मध्ये प्रोव्हिजन अॅन्ड अदर इन्कममध्ये रू.२,९०,००,०००/– इतका आंदाज दाखवला होता आणि प्रत्यक्ष खर्च रू. २,७२,७९,०२६/– इतका दाखवला आहे. तरी याबाबत माहिती द्यावी. त्याच प्रमाणे त्यांनी अशी विचारणा केली की, पुढील वर्षी बँकेची निवडणूक आहे व निवडणूकचा खर्च बँकेला करावा लागतो तरी यासाठी बँकेने काही तरतूद केली आहे का? नसल्यास ती करावी असे त्यांनी सांगितले.

**यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले की,** आपल्याला इन्कम टॅक्स पेएबल सारख्या तरतूदी काराव्या लागतात तसेच जो इतर खर्च करावा लागतो या करिता सन २०२३–२४ मध्ये रू. २,९०,००,०००/– इतका आंदाज दाखवला होता. मात्र प्रत्यक्षात रू. २,७२,७९,०२६/– इतका खर्च झाला आणि पुढील वर्षासाठी पुन्हा २,९०,००,०००/– इतका अंदाज दाखवण्यात आला आहे. निवडणूक खर्चा संदर्भात त्यांनी सांगितले की, हा खर्च सहकार खात्याकडून मागणी झाल्यावर दयायचा असतो त्याची तरतूद होत नाही.

**सभासद मा. श्री. सुरेश कोल्हे (सभासद क्र.५५९८) यांनी विचारले की** मागिल वर्षी आपला प्रिंटीग स्टेशनरीचा खर्च रू. ५,१९,२९८/– इतका झाला होता. त्याचा अंदाज पुढील वर्षासाठी रू. ३,५०,०००/– इतका केला आहे असे का ? यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले की, आर्थिक वर्ष २०२३–२४ मध्ये ऑडीनरी लोन, इर्मजींशी लोन आणि फेस्टीवल एडव्हास या कर्जाचे अर्ज दोन भाषेत छापून घेण्यात आले म्हणून खर्च जास्त झाला पुढील वर्षी इतका खर्च करावा लागणार नाही म्हणून अंदाज कमी केला आहे. मात्र प्रिंटीग स्टेशनरीचा खर्च आवश्यकतेनुसार होत असल्यामुळे कदाचीत यावर्षात अंदाजा पेक्षा त्यात वाढही होऊ शकते आणि अशी वाढ झाल्यास वार्षिक सर्वसाधारण सभेची त्यास मंजुरी घेण्यात येईल असे त्यांनी सांगितले. यावर मा. सभासद श्री. राजेंद्र गवस यानी २०२२–२३ मध्ये खरेदी केलेल्या A4 साईज पेपरच्या खरेदीबद्दल विषय काढला असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्याना सांगितले की, आपण हा पेपर २० वर्ष पुरेल इतका खरेदी केला आहे असे म्हणत अहात परंतु बँकेने फक्त २५० पॅकेटस् खरेदी केली आहेत याची नोंद घ्यावी असे त्यानी सांगितले. त्याच प्रमाणे आम्ही तुम्हाला पत्र दिले आहे असेही त्यांनी सांगितले यावर श्री. राजेंद्र गवस यांनी सांगितले की, मला माझ्या प्रश्नाचे उत्तर काल दि. २८.०८.२०२४ रोजी मिळाले आणि त्या पत्रावर दि. २२.०८.२०२४ ही तारिख टाकण्यात आली होती. तरी आज मिटीग असल्यामुळे जाणीवपूर्वक मला उत्तर उशिरा देण्यात आले आहे तसेच माझ्या २६.०८.२०२४ च्या पत्राला अदयाप उत्तर मिळाले नाही असे त्यांनी सागितले.

**यावर मा. उपाध्यक्ष श्री. संदीप आंबोकर यांनी त्यांना सांगितले की,** आम्ही संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी वार्षिक सर्वसाधारण सेभेच्या तयारीत व्यस्त होतो त्यामुळे आम्हाला उत्तर देण्यास उशिर झाला परंतु आपल्याला जी माहिती हवी आहे ती निश्चित मिळेल तसेच जी कागदपत्रे आपल्याला पहावयाची आहेत ती आपल्याला पहाता येतील परंतु त्याच्या प्रती किंवा फोटो आपल्याला घेता येणार नाही. यावर श्री राजेंद्र गवस यांनी असे सांगितले की, जे काही आहे ते मला लेखी स्वरूपात दया. त्यांनी असे ही सांगितले की बेसेकर साहेबांनी असे सांगितले होते की, स्टेशनरी थोडी जास्त झाली त्याचा अंदाज चुकला कारण एका बॉक्समध्ये किती रिम असतात ते आम्हाला कळले नाही असे सांगितले होते आणि त्याच्या अनूषंगाने मी पत्र दिले आहे. त्यांनी सांगितले

INCOME-TAX DEPT. CO-OP. BANK LTD. * MUMBAI *

की मला उत्तर वेळेवर मिळत नाही आणि पत्राच्या तारखेच्या नंतर मला प्रत्यक्ष पत्राची प्रत मिळते हा माझा आक्षेप आहे.

**यावर सभासद श्री. विजय झगडे यांनी सांगितले की** आपल्या सभेत फक्त दोन ते तीन लोक बोलतात तरी त्यांना वेळे वर उत्तर दिली तर सभेचा वेळ वाचेल. यावर श्री. राजेंद्र गवस यांनी सांगितले की, मी संचालक मंडळाला पत्र दिले होते तरी संचालक मंडळाने मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या या चुकी बद्दल विचारणा करावी. त्याच प्रमाणे संचालक मंडळाला पत्र दिले असल्याने संचालक मंडळाने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना आदेश देणे आवश्यक आहे. **त्यानंतर श्री. राजेंद्र गवस यांनी सांगितले** आपण मला कधी उत्तर देणार याची मला तारिख दयावी. यावर मा. उपकार्याध्यक्ष श्री. संदीप आंबोकर यांनी सांगितले की, येत्या दोन महिन्यामध्ये आपणास उत्तर देण्यात येईल.

**त्यानंतर सभासद श्री. रूपेश आंबेकर** यांनी सांगितले की आपल्या पे ईन स्लिपवर दिनांक वर्ष आहे त्यावर वर्षा च्या रकाण्यात २०० लिहले आहे त्यामुळे आता त्यावर दुरूस्ती करून २०२४ लिहावे लागते. यावर ही स्टेशनरी पूर्वी छापलेली असेल असे सभेच्या अध्यक्षांनी सांगितले असता मा. सभासद श्री. रूपेश आंबेकर यांनी विचारणा केली की आपण २० वर्षासाठी स्टेशनरी छपाई केली होती का? आणि असे असेल तर ते चूकीच आहे. तरी जर बँकेने एकत्र छपाई करून घेतली असेल तर वर्षाच्या रकाण्यात २० छापले असते तर वर्ष लिहता आले असते. ही स्टेशनरी तीन वर्षा पूर्वी छापून घेण्यात आली होती तर ते चुकीचे आहे असे त्यांनी सांगितले यावर सभासद श्री. प्रमोद दाहाट यांनी सांगितले की जर या स्लिपा चुकीच्या असतील तर त्या रद्द करण्यात याव्यात यावर श्री. रूपेश आंबेकर यांनी सागितले की नविन स्लीपा येई पर्यंत या स्लीपा चालवून घ्या.

त्यानंतर सभेचे अध्यक्ष मा. श्री. शीतल तळपदे यांनी संबधीत ठराव मांडला असता मा. संचालक मंडळाने तयार केलेल्या सन २०२३–२४ सालाकरीताच्या अंदाजपत्रकापेक्षा बाबनिहाय जास्त झालेला खर्चास तसेच सन २०२४–२५ सालचे उत्पन्न व खर्चाचे अंदाजपत्रकास मंजूरी देण्यात आली. त्यानूसार खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यात आला.

**ठराव क्र. ८:**

**आज गुरूवार, दिनांक २९ ऑगस्ट, २०२४ रोजी आयोजित करण्यात आलेली इन्कम टॅक्स डिपार्टमेंट को–ऑप. बँक लि. या बँकेची ९८ वी अधिमंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा असा ठराव करीत आहे कि, बँकेच्या सन २०२३–२४ च्या मंजूर अंदाजपत्रकापेक्षा बाबनिहाय जास्त झालेल्या खर्चास मंजूरी देणे तसेच सन २०२४–२५ चे उत्पन्न व खर्चाचे अंदाजपत्रकास ही सभा मंजूरी देत आहे.**

**सुचक : श्री. रविंद्र राजाराम गुरव**
**अनुमोदकः श्री. विजय झगडे**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

**विषय क्र ९:– संचालक मंडळाने सुचविलेल्या उपविधी दुरूस्तीला मान्यता देणे.**

उपरोक्त विषया संदर्भात.त्यानंतर सभेचे अध्यक्ष मा. श्री. शीतल तळपदे यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी याना सदर विषया संदर्भात सभागृहास माहिती देण्यास सांगितले असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी उपविधी क्र.



INCOME-TAX DEPT. CO-OP BANK LTD. * MUMBAI *

३, १०, ११, १२, १४, १५, १६, १७ आणि १८ या मध्ये करावयाच्या सुधारनां संदर्भात सभेला सविस्तर माहिती दिली. सदर माहिती देताना उपविधी क्र. ३ संदर्भात त्यांनी सांगितले की ठाणे जिल्ह्याचे विभाजन झाल्यामुळे आपण आपले कार्यक्षेत्र मुंबई ठाणे आणि पालघर असे करीत आहोत. उपविधी क्रमांक १०,११ आणि १८ He/She ही अक्षरे जेथे फक्त He आहे तेथे बदलावयाची आहेत. उपविधी क्रमांक १२, १४,१५,१६,१७, हे उपविधी आता शासनाने जी. आर. काढून पूर्वीची क्रियाशील सभासद ही संकल्पना काढून टाकल्यामुळे त्यानुसार बदलण्यात येत आहेत अशी माहिती त्यांनी दिली. त्यांनी पुढे सांगितले की, भारतीय रिझर्व्ह बँकेनेही या उपविधीमध्ये सुधारणा करण्याची सूचना दिली आहे. तरी आपण त्यास मंजुरी द्यावी. ते म्हणाले की, वार्षिक सर्वसाधारण सभेची मंजुरी मिळाल्या नंतर सदर प्रस्ताव मा. सहकार आयुक्त यांच्या मजुरीसाठी पाठवीला जाईल आणि त्यांच्या मंजुरीनंतरच उपविधीमध्ये बदल करण्यात येतील.

**या संदर्भात मा. सभासद श्री. राजेन्द्र गवस यांनी सूचना केली की,** तुम्ही उपविधी दुरुस्ती अहवालात इंग्रजी मध्ये छापली आहे तरी तिचा मराठी अनुवादही छापावा की, जेणेकरून सर्वांना उपविधीमधील बदल समजू शकतील या वर मा. उपकार्याध्यक्ष श्री. संदीप आंबोकर यांनी सांगितले की, आपली सूचना योग्य आहे पुढील वेळेस आम्ही त्या प्रमाणे कार्यवाही करू.

**त्या नंतर मा. सभासद श्री. प्रमोद दहाट यांनी उपविधीमधील सुधारणे मध्ये खालील बदल सांगितले.**

१) उपविधी क्रमाक १०, ११ मध्ये आपण ज्या ठिकाणी He/She बदल केले आहेत त्या व्यतिरिक्तही अन्य ठिकाणी ते बदल करणे आवशयक आहे आणि त्या नुसार त्यांनी त्या जागा दाखवून दिल्या आणि त्या ठिकाणी बदल करून नंतर प्रस्ताव आयुक्ताना पाठवावा,अशी सूचना केली.

२) उपविधी क्रमाक १० आणि १२, १४,१५,१६,१७ संदर्भात त्यांनी सांगितले की, या उपविधी संदर्भात महाराष्ट्र सरकारने जो ऑरडीनन्स पास केला आहे त्याचा उल्लेख करावा अशी सूचना केली.

३) त्याच प्रमाणे त्यांनी सांगितले की, या उपविधीमध्ये जेथे सोसायटी असा उल्लेख आहे तेथे बँक असा उल्लेख करावा.

४) त्याचबरोबर त्यांनी सांगितले की, मला उपविधीमध्ये अजून काही बदल सुचवायचे आहेत परंतु आत्ता ते शक्य नाही तरी मी ते नंतर कार्यालयात येउन मुख्यकार्यकारी अधिकारी किंवा संचालक मंडळ सदस्यांना स्वतः येऊन सांगेन.

**यावर उपकार्याध्यक्ष श्री. संदीप आंबोकर यांनी** त्यांना आपण सुचविल्या प्रमाणे उपविधीमध्ये बदल करण्यात येतील तसेच पुढील बदलासाठी आपण कार्यालयात येऊन चर्चा करावी असे सांगितले. त्या नंतर मा. संचालक श्री. प्रमोद वाघे यांनी खालीलप्रमाणे ठराव क्रमाक ९ सभेपुढे मांडला असता बँकेच्या उपविधी मध्ये संचालक मंडळाने सुचविल्या नुसार दुरुस्ती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली आणि त्यानुसार खालील प्रमाणे ठराव सर्वानुमते संमत करण्यात आला.

INCOME-TAX DEPT. CO-OP. BANK LTD. MUMBAI

३, १०, ११, १२, १४, १५, १६, १७ आणि १८ या मध्ये करावयाच्या सुधारनां संदर्भात सभेला सविस्तर माहिती दिली. सदर माहिती देताना उपविधी क्र. ३ संदर्भात त्यांनी सांगितले की ठाणे जिल्ह्याचे विभाजन झाल्यामुळे आपण आपले कार्यक्षेत्र मुंबई ठाणे आणि पालघर असे करीत आहोत. उपविधी क्रमांक १०,११ आणि १८ He/She ही अक्षरे जेथे फक्त He आहे तेथे बदलावयाची आहेत. उपविधी क्रमांक १२, १४,१५,१६,१७, हे उपविधी आता शासनाने जी. आर. काढून पूर्वीची क्रियाशील सभासद ही संकल्पना काढून टाकल्यामुळे त्यानुसार बदलण्यात येत आहेत अशी माहिती त्यांनी दिली. त्यांनी पुढे सांगितले की, भारतीय रिझर्व्ह बँकेनेही या उपविधीमध्ये सुधारणा करण्याची सूचना दिली आहे. तरी आपण त्यास मंजुरी द्यावी. ते म्हणाले की, वार्षिक सर्वसाधारण सभेची मंजुरी मिळाल्या नंतर सदर प्रस्ताव मा. सहकार आयुक्त यांच्या मजुरीसाठी पाठवीला जाईल आणि त्यांच्या मंजुरीनंतरच उपविधीमध्ये बदल करण्यात येतील.

**या संदर्भात मा. सभासद श्री. राजेन्द्र गवस यांनी सूचना केली की,** तुम्ही उपविधी दुरुस्ती अहवालात इंग्रजी मध्ये छापली आहे तरी तिचा मराठी अनुवादही छापावा की, जेणेकरून सर्वांना उपविधीमधील बदल समजू शकतील या वर मा. उपकार्याध्यक्ष श्री. संदीप आंबोकर यांनी सांगितले की, आपली सूचना योग्य आहे पुढील वेळेस आम्ही त्या प्रमाणे कार्यवाही करू.

**त्या नंतर मा. सभासद श्री. प्रमोद दहाट यांनी उपविधीमधील सुधारणे मध्ये खालील बदल सांगितले.**

१) उपविधी क्रमाक १०, ११ मध्ये आपण ज्या ठिकाणी He/She बदल केले आहेत त्या व्यतिरिक्तही अन्य ठिकाणी ते बदल करणे आवश्यक आहे आणि त्या नुसार त्यांनी त्या जागा दाखवून दिल्या आणि त्या ठिकाणी बदल करून नंतर प्रस्ताव आयुक्ताना पाठवावा अशी सूचना केली.

२) उपविधी क्रमाक १० आणि १२, १४,१५,१६,१७ संदर्भात त्यांनी सांगितले की, या उपविधी संदर्भात महाराष्ट्र सरकारने जो ऑरडीनन्स पास केला आहे त्याचा उल्लेख करावा अशी सूचना केली.

३) त्याच प्रमाणे त्यांनी सांगितले की, या उपविधीमध्ये जेथे सोसायटी असा उल्लेख आहे तेथे बँक असा उल्लेख करावा.

४) त्याचबरोबर त्यांनी सांगितले की, मला उपविधीमध्ये अजून काही बदल सुचवायचे आहेत परंतु आत्ता ते शक्य नाही तरी मी ते नंतर कार्यालयात येउन मुख्यकार्यकारी अधिकारी किंवा संचालक मंडळ सदस्यांना स्वतः येऊन सांगेन.

**यावर उपकार्याध्यक्ष श्री. संदीप आंबोकर यांनी** त्यांना आपण सुचविल्या प्रमाणे उपविधीमध्ये बदल करण्यात येतील तसेच पुढील बदलासाठी आपण कार्यालयात येऊन चर्चा करावी असे सांगितले. त्या नंतर मा. संचालक श्री. प्रमोद वाघे यांनी खालीलप्रमाणे ठराव क्रमाक ९ सभेपुढे मांडला असता बँकेच्या उपविधी मध्ये संचालक मंडळाने सुचविल्या नुसार दुरुस्ती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली आणि त्यानुसार खालील प्रमाणे ठराव सर्वानुमते संमत करण्यात आला.

INCOME-TAX DEPT. CO-OP. BANK LTD. * MUMBAI *

ठराव क्र ९ :-

**आज गुरूवार, दिनांक २९ ऑगस्ट, २०२४ रोजी आयोजित करण्यात आलेली इन्कम टॅक्स डिपार्टमेंट को–ऑप. बँक लि. या बँकेची ९८ वी अधिमंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा असा ठराव करीत आहे कि,** संचालक मंडळाने सुचविलेल्या बँकेच्या उपविधी दुरुस्तीस ही सभा मंजुरी देत आहे.

सूचक :- श्री. राजेंद्र भिकाजी गवस

अनुमोदक :- श्री. अंकुश भरगुडे

ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र १० :– सभासदांच्या अनुपस्थितीची नोंद घेऊन ती क्षमापित करणे.**

९८ व्या अधिमंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असणाऱ्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करण्याबाबत सभेचे अध्यक्ष श्री शीतल तळपदे यांनी विषय क्र. ९ संबंधीत ठरावाचे वाचन करण्याची सुचना केली. **त्यानूसार मा. संचालक श्री. राजेंद्र भागवत यांनी सदर विषयाचे वाचन करून सदर ठराव सभागृहा समोर मंजूरीकरिता ठेवला.** या वर सभासद मा. श्री. प्रमोद दाहाट यांनी असे सांगितले की, ९७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये हा विषय घेतला न्हवता तरी सदर ठरावामध्ये ९७ व्या व ९८ व्या असे नमूद करावे. त्यांच्या सुचनेची सभेत नोंद घेण्यात आली आणि त्यानुसार बदल करण्याचे ठरविण्यात आले. त्यानंतर त्यानुसार अधिमंडाळाच्या वार्षिक सभेस अनुपस्थित असणाऱ्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापीत करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली आणि मंजूरी देण्यात आली आणि खालील प्रमाणे ठराव सर्वानुमते संमत करण्यात आला.

**ठराव क्र १० :**

**आज गुरूवार, दिनांक २९ ऑगस्ट, २०२४ रोजी आयोजित करण्यात आलेली इन्कम टॅक्स डिपार्टमेंट को–ऑप. बँक लि. या बँकेची ९८ वी अधिमंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा असा ठराव करीत आहे कि, ९७** व्या आणि ९८ व्या **अधिमंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असणाऱ्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करण्यास ही सभा मंजूरी देत आहे.**

**सुचक : श्री.** रुपेश सदानंद आंबेकर

**अनुमोदक: श्री.** गिरीश बापू राउत

**ठराव सर्वानुमते मंजूर**



INCOME-TAX DEPT. CO-OP. BANK LTD. * MUMBAI *

**या नंतर मा. सभासद श्री. प्रमोद दाहाट यांनी पुन: अशी सूचना केली की,** सभागृहाची जर मंजुरी असेल तर ही सभा पुढे चालवावी आणि त्यानंतर उपस्थित सभासदांनी सभा पुढे सुरु ठेवण्यास सर्वानुमते मंजुरी दिली आणि त्या नंतर या सभेचे कामकाज पुढे सुरु राहील असे सभेचे अध्यक्ष मा. श्री शीतल तळपदे यांनी सांगितले व त्यानुसार सभेचे कामकाज पुढे सुरु करण्यात आले.

**यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले की,** उपविधी दुरुस्ती मध्ये आणखी एक सुधारणा आहे. उपविधी क्रमांक १८ मध्ये Clause F असे जे लिहिले आहे ते काढून टाकावयाचे आहे. त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

**विषय क्र ११:– अध्यक्षांच्या परवानगीने येणारे इतर विषय.**

सभेचे अध्यक्ष श्री. शीतल तळपदे यांनी अध्यक्षांच्या परवानगीने येणाऱ्या इतर विषयावर चर्चा करण्याची परवानगी दिली आणि बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अजित जाधव यांना सभासदांकडून बँकेला प्राप्त झालेल्या पत्रांचे वाचन करण्यास सांगितले. त्यानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खालीलप्रमाणे पत्रांचे वाचन केले आणि सदर पत्राबाबत मुद्देनिहाय खुलासा करण्यात आला.

**पत्र १ :- शंकर ना. उथळे (सभासद क्र. १५८८) व इतर २० यांचे दि, २३.०८.२०२४ चे सामुहीक पत्र.**

सदर पत्र सभेमध्ये वाटण्यात येणारया अल्पोपहाराबाबत होते. सदर पत्राचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी वाचन केले. **या संदर्भात मा. सभासद श्री. विजय झगडे यांनी सांगितले की,** अल्पोपहाराचे वाटप करत असताना धक्काबुक्की होते. त्यामुळे अल्पोपहार सभागृहात वाटण्यात यावा. जर अल्पोपहार सभेमध्ये दिला असता तर आज जी सभागृहात उपस्थिती कमी दिसत आहे ती दिसली नसती सभागृह भरलेले दिसले असते. ते पुढे म्हणाले की, इतिवृत्ताचे वाचन होते तेंव्हा बरेचसे सभासद अल्पोपहार घेण्यासाठी बाहेर जातात. मग हे इतिवृत्त वाचून काय फायदा? **मा. सभासद श्री. रुपेश आंबेकर आणि श्री प्रभाकर झगडे (सभासद क्र.७१०१)** यांनीही सभागृहात जे सभासद उपस्थित राहतील त्यांनाच अल्पोपहार द्या असे सांगितले.

**यावर उपकार्याध्यक्ष श्री. संदीप आंबोकर यांनी सांगितले की,** आता आपण टोकन सर्विस सुरु केली आहे तरीही गर्दी होत आहे. ते म्हणाले की, सभासदांना आपण शेवट पर्यंत सभेला उपस्थित राहण्याची सक्ती करू शकत नाही आणि जबरदस्ती सभागृहात बसवूही शकत नाही. सभासद मा. श्री. राजेंद्र गवस यांनी सांगितले की, तुम्ही कुपन किती छापली आणि अल्पोपहाराची पाकीट किती मागविलीत? यावर उपकार्याध्यक्ष श्री. संदीप आंबोकर यांनी सांगितले की, आपल्या सभेस सभासदांची संख्या २०० ते २५० असते त्याचबरोबर इतर काही संस्था आहेत त्या गृहीत धरून आपण अल्पोपहाराची पाकीट मागवतो मागच्या वर्षी आपण १००० पाकीट मागवली होती या वर्षी आपण ७०० पाकीट मागविली आणि ७०० ते ७५० कुपन छापली आहेत. **यावर श्री. राजेंद्र गवस यांनी अशी विचारणा केली की,** एक पाकीट साधारण कितीला पडते. यावर मा.उपकार्याध्यक्ष श्री. सदीप आंबोकर यांनी एक पाकीट साधारण ६०० ते



INCOME-TAX DEPT. CO-OP. BANK LTD. * MUMBAI *

६५० ला पडते असे सांगितले. **यावर राजेंद्र गवस असे म्हणाले की,** आपले साधारण ३६०० सभासद आहेत आणि साधारण अल्पोपहाराकरिता रु. ४.०० लाखापर्यंत खर्च येतो तर हा खर्च विभागून जी रक्कम येते ती सभासदांच्या खात्यात जमा करा किंवा तुम्ही अहवालात छापुन टाका की, सभेच्या शेवटी अल्पोपहाराचे वाटप होईल.

**यावर मा. सभासद श्री. प्रमोद दाहाट** यांनी सांगितले की, १९९७ पासून मी या बँकेचा सभासद आहे. खाऊची पाकीट सभागृहात वाटताना मी बघितली आहेत आणि २०१४ साली असा प्रसंग घडला होता की, राष्ट्रगीत सुरू असताना खाऊच्या पाकिटासाठी सभासद भांडत होते. तेव्हा मी पहिला विषय मांडला की, खाऊची पाकिट महत्वाची नाही आणि जर तुम्हाला ती वाटायची असतील तर ती सभागृहाच्या बाहेर वाटा. तरी माझी सभागृहाला विनंती आहे की, आपण या विषयाला जास्त महत्व देऊ नये. **यावर मा. उपकार्याध्यक्ष श्री. संदीप आंबोकर यांनी सांगितले की,** त्यावेळी जे संचालक मंडळ असेल ते याबाबत योग्यतो निर्णय घेईल असे सांगितले.

**पत्र २ :- श्री. रुपेश आंबेकर यांचे दि, २३.०८.२०२४ चे पत्र.**

मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदर पत्राचे श्री. रुपेश आंबेकर यांच्या मुद्यानुसार वाचन केले.

**मुद्या क्र. १ – सभासदांना वार्षिक अहवाल उशिरा मिळाल्या बाबत आणि लेखी सूचना अहवालात २६.०८.२०२४ आणि नोटीस बोर्डावर २३.०८.२०२४ अशी छापल्या बाबत होता.यावर मा. उपकार्याध्यक्ष श्री. संदिप आंबोकर साहेब यांनी सांगितले की,** बँकेचा १८ वा वार्षिक अहवाल उशिरा मिळाल्याबद्दल आम्ही सर्वप्रथम दिलगिरी व्यक्त करतो. या संदर्भात आम्ही आपणास कळवू इच्छितो की, अहवालामध्ये मा. पदसिध्द अध्यक्षाचा फोटो छापायचा होता. तो मिळण्यास विलंब झाला. त्यांचा फोटो नसल्यामुळे बाकी सर्व मसुदा जरी तयार असला तरी अहवाल छपाई करता येत नव्हती. त्याच प्रमाणे विद्यमान प्रधान मुख्य आयकर आयुक्त यांचा फोटो आणि मनोगत मिळवण्याचा प्रयत्न करण्यात येत होता. त्याच प्रमाणे आपण अहवालात गुणवंत विद्यार्थ्यांची नावे छापतो ती सुध्दा छपाईचे काम सुरू असे पर्यत येत होती. प्रत्येक सभासदाची इच्छा असते की, आपल्या पाल्याचे नाव अहवालात छापुन यावे. त्यामुळे अंतीम तारिख न पहाता आपण ही नाव घेत गेलो. आपले प्रिंटर बदलापुर येथील होते. ऑगस्ट महिन्यामध्ये घडलेल्या बदलापुर येथिल प्रकरणामुळे एक दिवस पूर्ण बदलापुरची वाहतुक सेवा बंद होती. त्यामुळे त्याना सुध्दा अहवालाची डिलेव्हरी देण्यास एक दिवस उशिर झाला. त्यामुळे अहवाल तयार करण्याचे काम जरी एक दोन महिने अगोदर सुरू झाले तरी ही प्रत्यक्ष अहवाल छपाई करून मिळण्यास विलंब झाला. या सर्व कारणांमुळे आपणास अहवाल उशिरा मिळाला. मात्र असे जरी असले आणि जरी अहवालात लेखी सूचना देण्याची तारीख २६ ऑगस्ट छापली असली आणि नोटीसमध्ये २३ ऑगस्ट तारिख छापली असली तरी सुध्दा त्यानंतर ही सभासदांची जी काही पत्र आली ती सर्व आपण स्वीकारली असून या सर्व प्रश्नांना आपण उत्तर देत आहोत. त्याच प्रमाणे आताही अध्यक्षांच्या परवानगीने येणाऱ्या विषयामध्ये जे सभासद प्रश्न उपस्थित करणार आहेत त्यावर आपण चर्चा करणार आहोत असे सांगितले.

**यावर मा. सभासद श्री. राजेंद्र गवस यांनी सांगितले की,** सभासदांना जर नियमानूसार १५ दिवस आगोदर अहवाल मिळाला तर ते ५ –६ दिवस अहवालावर अभ्यास करतील आणि विहित वेळेत त्यांचे प्रश्न मांडतील तरी पुढील वर्ष संचालक मंडळाने याची दखल घ्यावी आणि वेळेत सभासदांना अहवाल प्राप्त होतील अशी कार्यवाही करावी अशी सुचना त्यांनी दिली.

INCOME-TAX DEPT CO-OP BANK LTD. * MUMBAI *

**मुद्दा क्र. २ – जास्वंदी योजने अंतर्गत सरकारी कर्ज रोख्यांच्या तारणावर घेतलेल्या ओव्हर ड्राफ्ट संदर्भात होता यासंदर्भात याचे स्पष्टीकरण यापूर्वी झाले आहे असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी** सांगितले.

**मुद्दा क्र. ३ – आपल्या बँकेची २ करोडची एफडी पंजाब महाराष्ट्र बँकेत आहे. त्याचा सविस्तर उल्लेख पान क्र. २३ वर जी आमचा माहितीनुसार २ करोड असता एक करोड एकोनएशी लाख चौसष्ट हजार नवशे ऐंशी रूपये दाखवून त्याच्यावर व्याज चौवे चाळीस लाख एक्कावन हजार दोनशे चाळीस रूपये असे मिळून २ करोड २४ लाख ५६ हजार २४० रूपये दाखवले आहेत असे का दाखवण्यात आले ह्याचा सर्व सभासदांना खुलासा करून सांगावा.**

**यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले की,** आपल्या बँकेचे पंजाब ॲण्ड महाराष्ट्र को ऑप. बँकेमध्ये एकूण दोन कोटी इतके डिपॉझीट होते. या बँकेचे युनिटी स्मॉल फायनान्स बँकेमध्ये विलनिकरण झाल्यानंतर या मुदत ठेवीवरिल रू. २४ लाख व्याज मिळून होणारी एकूण रक्कम रू. २,२४,५६,२२०/– लाख होत होती त्यापोटी आपल्याला ८०% रक्कम रू. १,७९,६४,९८०/– इतक्या रक्कमेचे इनोवेटीव परपेच्युअर डेबट बॉन्ड देण्यात आले आणि उवर्रित २०% रक्कम रू. ४४,९१,२४०/– इक्विटी वॉरंट देण्यात आले. तरी ती रक्कम पान क्र. २३ वर दिसत आहे असे त्यांनी सांगितले. यावर श्री. रूपेश आंबेकर यांनी विचारले ही रक्कम वेगवेगळी न दाखवता एकत्रीत का दाखवली आहे यावर मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणाले ही दोन वेगवेगळी प्रमाणपत्र असल्यामुळे ही रक्कम वेगवेगळी दाखवण्यात आली आहे. **या वर श्री. रूपेश आंबेकर यांनी सांगितले की** आपण जर कंसामध्ये याचे स्पष्टीकरण दिले असते तर समजायला सोपे गेले असते. यावर मा. उपकार्याध्यक्ष श्री. सदिप आबोकर यांनी सांगितले की भारतीय रिझ्र्व बँकेने हा फॉरमेट दिला आहे आणि ते त्याच प्रमाणे तयार करावे लागते.

**मुद्दा क्र. ४ – नविन मुख्य कार्यकारी अधिकारीची नियुक्ती कधी करणार सध्या जे असिटंट मेनेजर आहेत त्यांची आवश्यकता का आहे आणि बँकेत एक आयटी ऑफीसर असताना नविन आयटी ऑफीसरची जाहिरात का दिली?**

**या संदर्भात मा. उपकार्याध्यक्ष श्री. संदिप आंबोकर साहेब यांनी सांगितले की,** आपल्या बँकेची भारतीय रिझर्व बँकेने २०१९ ते २०२३ या चार वर्षा करिता आर्थिक तपासणी केली. या वेळी भारतीय रिझर्व बँकेने जवळ जवळ शंभर त्रुटी काढल्या त्याचा दोषदुरूती अहवाल तयार करणे आवश्यक होते त्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी बदलणे त्यावेळेस शक्य नव्हते. तसेच श्री. अजित जाधव मुख्य कार्यकारी अधिकारी यांनाही त्यांच्या वैयक्तीक कारणामुळे निवृत्ती हवी होती. त्यामुळे त्यांनी ही राजिनामा दिला आहे. त्यांचा राजिनामा संचालक मंडळाने मंजुर केला असून ते दि. ३१.०८.२०२४ पासून निवृत्त होत आहेत. त्याच प्रमाणे आपण नविन मुख्य कार्यकारी अधिकारी पदाच्या नेमणूकीसाठीची प्रक्रिया पूर्ण केली असून श्री. सुधिर राजाराम गुजर यांची निवड केली असून सध्या ते कुर्ला नागरीक सहकारी बँक येथे सहाय्यक सरव्यवस्थापक म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी तेथे राजिनामा दिला असून ते आपल्याकडे दि. ०४.१०.२०२४ रोजी पासून रूजु होणार आहेत अशी महिती त्यांनी दिली व नवीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांची सभागृहाला ओळख करून दिली. आयटी ऑफीसर बाबत त्यांनी असे सांगितले की आपल्याकडे सध्या एकआयटी ऑफीसर आहेत परंतु ते जेव्हा रजेवर असतात तेव्हा बँकेला आयटी संदर्भातील कामात समस्या उध्दभवतात मागे त्यांचा मुलगा आजारी असताना ते रजेवर होते त्यावेळी त्यांनी अश्या



INCOME-TAX DEPT. CO-OP. BANK LTD. * MUMBAI *

परिस्थितीतही घरून काम केले होते. यामुळे तसेच बँकेचे काम करताना एक मेकर आणि एक चेकर लागतो आणि आपले जे इडीपी ऑडीटर व वैधानिक लेखापरिक्षक आहेत त्यांनी सुध्दा आपले आयटी विभागाचे मनुष्य बळ अत्यंत कमी आहे असे सांगितले होते त्या अनूषगाने त्यांना सहाय्यक म्हणून आपण एक आयटी ऑफीसर घेत आहोत असे त्यांनी सांगितले.

**यावर श्री. राजेंद्र गवस यांनी सांगितले की** आपल्या बँकेतील एक कर्मचाऱ्याला हे पद देऊन श्री. विशाल गावडे यांचा सहाय्यक म्हणून त्यांची नेमणूक करावी. यावर मा. उपकार्याध्यक्ष श्री. संदिप आबोकर साहेब यांनी सांगितले की या पदासाठी आयटी संदर्भातील शिक्षण व पात्रता आवश्यक आहे म्हणून असे करता येणार नाही.

**त्यानंतर माजी सभासद श्री. अरूण कसबे व श्री. सुभाष आंबेकर यांनी बोलण्याचा प्रयत्न केला असता** ते सभासद नसल्याने त्यांना या सभेत बोलता येणार नाही असे सभेच्या अध्यक्षांनी सांगितले. या संदर्भात मा. सभासद श्री. प्रमोद दाहाट यांनी सांगितले की, निवृत्त सभासदांना सभेत सहभागी होता येणार नाही अशी उपविधी मध्ये तरतूद आहे. यावर्षी दोनजन बोलतील तर पुढच्या वर्षी दहाजन बोलतील तरी याला परवानगी देऊ नये असे त्यानी सांगितले.

**त्यानंतर मा. सभासद श्री. विजय झगडे यांनी सांगितले की,** बँकेची प्रगती होत आहे. तरी बँकेला जर तंत्रज्ञानातील माहिती असणारा व्यक्ती हवा असेल तर पैश्याचा विचार न करता असा व्यक्तीची नेमणूक करण्यात यावी तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी ही बँकींग संदर्भातील पूर्ण माहिती असणारा असावा असे त्यांनी सांगितले.

**मुद्या क्र. ५ - बँकेतील जुने कर्मचारी उदा. गायकवाड, दिपा, अपूर्वा , रोहिनी , शिबानी, विशाल, मगरे हे एवढे वर्ष प्रमाणीक पणे काम करत आहेत त्यांना अजुन प्रमोशन का देत नाही?**

**या संदर्भात मा. उपकार्याध्यक्ष श्री. संदिप आंबोकर साहेब यांनी सांगितले की,** आपण दिलेल्या यादी पैकी श्री. गायकवाड आणि शिबानी यांना अधिकारी पदावर बढती देण्यात आली आहे. रोहिनी ही अधिकारी पदाचेच काम करत आहे, विशाल यांची बढती विचाराधिन आहे. तरी जुन्या कर्मचाऱ्यांच्या बढती बाबत बऱ्या पैकी कार्यवाही करत आहोत. मात्र सेवा जेष्ठता बढतीसाठी त्यांची ठराविक वर्ष सेवा पूर्ण होणे आवश्यक आहे. आपण जी नविन लिपीक पदाची भरती केली आहे ती रितसर परिक्षा घेऊन गुणवत्तेच्या आधारावर करण्यात आलेली आहे आणि हे सर्व नविन कर्मचारी जुन्या कर्मचाऱ्यांच्या हाता खाली काम करीत आहेत. या व्यतीरिक्त व्यवस्थापनाची जी पदे आहेत त्यामध्ये आपण एक डेप्युटी सी.ई.ओ. आणि सी.ई.ओ. ही थेट बाहेरून भरली आहेत. त्यामुळे जुन्या कर्म चाऱ्यांच्या वर आणून कोणता नविन अधिकारी आम्ही बसवलेला नाही असे त्यांनी सांगितले.

**यावर मा. सभासद श्री. राजेंद्र गवस यांनी सांगितले की** या अधिकाऱ्यांना बढती दिल्यानंतर ज्या जागा रिक्त होणार त्या रिक्त झालेल्या जागी आपल्याला नविन भरती करावी लागेल. यावर मा. उपकार्याध्यक्ष श्री. संदिप आंबोकर यांनी सांगितले की, या संदर्भात बँकेने आकृती बंध मंजुर केला असून त्यानूसार भरती करण्यात येते. त्यानूसार आपण लिपीक पदाची भरती केली होती परंतु तीन उमेदवारांना या पेक्षा चांगली नोकरी मिळाल्याने ते सोडून गेले त्यामुळे सध्यां आपण अधिकारी पदाची पुढे बढती दिली नाही. सौ अपूर्वा ही अधिकारी पदासाठी विचाराधीन आहे परंतु सध्या ती रजेवर आहे असे त्यांनी सांगितले.

INCOME-TAX DEPT. CO-OP. BANK LTD. * MUMBAI *

त्यानंतर त्यांनी सांगितले की जे प्रतिक्षा यादीवर होते त्यापैकी दोघांना आपण संधी दिली परंतु ते बाहेर गावचे उमेदवार असल्यामुळे त्यांना येथे परवडत नव्हते त्यामुळे ते रूजु झाले नाहीत. आता जी प्रतिक्षा यादी आहे ती आपण निश्चित केलेल्या गुणवत्तेच्या खाली आली असल्याने आपण ती यादी रद्द केली आहे आणि आत्ता जर आपल्याला कर्मचार्यांची आवश्यकता भासली तर आपल्याला पुन्हा नव्याने भरती प्राक्रिया करावी लागेल असे त्यांनी सांगितले. सध्या तरी आपल्या कडे पुरेसे कर्मचारी आहेत तरी तुर्तास आपल्याला भरती करण्याची आवश्यकता नाही असे त्यांनी सांगितले.

**मुद्दा क्र ६ - कौटील्य भवनमध्ये दुपारी बँक बंद होती** तिथल्या **कर्मचाऱ्यांना विचारणा केली असता आम्हाला जेवायला जाताना रिलीव्हर नाही असे त्यांनी सांगितले तरी नवीन दोन जन तीथे पाठवा. तसेच जुन्या संचालकांवर आरोप असायचे की ते आपल्या नातेवाईकांची भारती करतात पण आतापण कर्मचार्यांच्या नातेवाईकांची नवीन भरती केलीत मग तुमच्यात आणि त्यांच्यात फरक काय?**

**यावर मा. उपाध्यक्ष श्री. संदिप आंबोकर साहेब यांनी सांगितले की,** तिथे तिसऱ्या माणसासाठी पुरेसे काम असेल तरच तेथे माणूस पाठवणे योग्य होईल तरीही आम्ही यावर विचार करू असे त्यांनी सांगितले.

**मा. सभासद श्री. राजेंद्र गवस यांनी सांगितले की,** नविन भरतीमध्ये आमच्या शेजारी राहणाऱ्या मुलीने या भरतीमध्ये अर्ज केला होता. मी आयकर विभागात काम करतो म्हणून तीने माझ्याकडे याबाबत विचारणा केली. त्या अनूषंगाने मी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना भेटलो असता त्यांनी सांगितले की, ही भरती आयबीपीएस या संस्थे मार्फत परिक्षा घेऊन पूर्णपणे गुणवत्तेच्या आधारावर होणार आहे. हे समजल्यानतर त्याप्रमाणे मी त्या मुलीस कळविले. त्यानंतर ती मुलगी या परिक्षेत उत्तिर्ण होऊन बँकेत रूजू झाल्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी तीला बँकेच्या संचालक मंडळाच्या सभागृहात बोलावून असे सांगितले तुम्ही तुमच्या मेरिटवर उत्तिर्ण झालेला आहात तरी तुम्ही गवसांना काही पैसे वगैरे देऊ नका. मला सांगा हा किती मोठा अपमान आहे. ही गोष्ट मी मा. संचालक श्री. रवि शंकर आणि श्री. प्रमोद वाघे यांना सांगितली. अजुन पर्यंत मी आयकर विभागात प्रमाणिक पणे काम केले व लोकांची निस्वार्थीपणे कामे केली आणि आज जर तुमचे मुख्य कार्यकारी अधिकारी अशा प्रकारे तुमच्या कर्मचाऱ्याकडे माझी बदनामी करत असतील तर हा माझा अपमान नाही का ? असे त्यांनी सांगितले ते पुढे म्हणाले की, मी लवकरच निवृत्त होणार आहे तरी या शेवटच्या क्षणाला माझ्या नावाला लागलेला हा काळीमा आहे. तरी आपण याची दखल घ्यावी असे त्यांनी सांगितले.

**यावर उपाध्यक्ष श्री. संदिप आंबोकर यांनी सांगितले की,** मी तुमच्या भावना समजु शकतो आणि या मुळे किती वाईट वाटू शकते याची मला कल्पना आहे. यावर मा. सभासद श्री. विजय झगडे यांनी अशी विचारणा केली की, याबाबत आपल्या कमीटीमध्ये काही विचारणा झाली का? तसेच अशी घटना घडली का याचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अजित जाधव यांनी उत्तर दयावे.

**यावर मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अजित जाधव यांनी असे सांगितले की,** कोणी कोणाबद्दल काय बोलावे याबाबत मी काही बोलु शकत नाही पण मी असे बोललेलोच नाही आणि जर का मी असे काही बोललो असेन तर मी दिलगीरी व्यक्त करतो. त्यानंतर ते म्हणाले की, जर असे होते तर तुम्ही मला प्रत्यक्ष येऊन विचारायचे होते.



INCOME-TAX DEPT. CO-OP. BANK LTD. * MUMBAI *

**यावर मा. सभासद श्री. राजेंद्र गवस यांनी सांगितले की,** मी ही बाब संचालक मंडळातील सदस्यांना सांगितली होती आणि माझी अशी अपेक्षा होती की, त्यांनी याची शाहानिशा करावी परंतु तसे झाले नाही याची मला खंत वाटते. परंतु आपण जर म्हणत असाल की, मी असे बोललेलोच नाही आणि दिलगीरी व्यक्त करत असाल तर मग माझे आता याबाबत काही म्हणने नाही. यावर उपाध्यक्ष श्री. संदिप आंबोकर यांनी असे सांगितले की आता आपण हा विषय बंद करूया.

**मुद्दा क्रमांक ७. – बँकेच्या बोर्डरूममध्ये CEO आणि असीस्टंट मेनेजर हे सतत बसलेले असतात. CEO आणि असीस्टंट मेनेजर हे ब्रँच हॅन्डल करण्यासाठी असतात आणि त्यांच्या करिता आपल्या बँकेने केबिन बनवुन दिल्या आहेत तरीही हे दोघेजण बोर्डरूममध्ये का बसतात? आम्हाला मोठी रक्कम काढायची असल्यास बँकेच्या बोर्ड रूममध्ये जाऊन सह्या घ्यायच्या का ?**

**यावर उपाध्यक्ष श्री. संदिप आंबोकर यांनी सांगितले की,** काही महत्वाच्या कामाकरिता मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना बोर्ड रूममध्ये बसून काम करावे लागते आणि त्या कामाच्या वेळेस त्यांना जर असिस्टंट मॅनेजरची मदत हवी असेल तर ते त्यांना तेथे बोलवतात. मात्र यामुळे जर सभासदांना त्रास होत असेल तर यापुढे असे होणार नाही याची मी आपणाला खात्री देतो.

**यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले की,** जुन २०२३ ला आम्ही आपल्या बँकेचे चार वर्षाची तपासणी करण्याकरीता येत आहोत असे भारतीय रिझर्व बँकेच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. या करिता दयावयाच्या इंडेंटची माहिती दहा दिवसात तयार करावयाची होती. या काळामध्ये आपण सीएज् टॅक्नोलोजी या सॉफ्टवेअर मधुन बीएसजी सॉफ्टवेअरमध्ये मायग्रेशन केले होते. सीएज् टॅक्नोलोजी यांच्याकडे भारतीय रिझर्व बँकेच्या इंडेंटच्या अनूषंगाने डांटा मागितला तो त्यांनी योग्य प्रकारे दिला नव्हता. जुलै २०२३ मध्ये त्यांनी आपल्याला डाटा दिला आणि यापुढे आपण अधिक माहिती देऊ शकणार नाही असे कळवीले. त्यामुळे जुन्या डंपमधुन चार वर्षाचा डाटा कॉपी पेस्ट करून आम्ही दिवस रात्र बसून इंडेंट तयार केली या करिता मला बोर्ड रूम मध्ये बसून असीस्टंट मेनेजर यांच्या मदतीने काम करावे लागत होते. अजुनही भारतीय रिझर्व बँकेकडून कॉप्लायन्स येत आहेत आणि त्यावर काम करावे लागत आहे. मी प्रमाणिक पणे काम केले असून याही परिस्थितीत बँकेला पेनल्टी लागु दिली नाही. अश्या प्रकारे आम्ही डेटा पाठवला आणि ते २२ नोव्हेंबरला तपासणीसाठी आले व १ डिसेंबर पर्यंत ते तपासणी करत होते. आता हे सर्व करताना मी केबीन मध्ये कसा बसू असे ते म्हणाले व त्यांनी सांगितले की, असे जरी असले तरी सुध्दा मी ग्राहक सेवेत कुठेही मी कमी पडलो नाही. माझ्याकडे आलेली प्रत्येक विड्रावल आणि अर्ज मी त्वरित पास केला. तसेच भारतीय रिझर्व बँकेला हवी असलेली सर्व माहिती दिलेली आहे. मात्र त्यानंतर तीन कॉप्लायस आले, भारतीय रिझर्व बँकेला केव्हाही माहिती हवी असते आणि ती तातडीने त्याच दिवशी दयायची असते आताही असीस्टंट मेनेजर सभागृहात नाहीत कारण एक्टेंशन काऊंटरच्या लायसनबद्दल भारतीय रिझर्व बँकेला तातडीची माहिती देत आहेत. ते पुढे म्हणाले की, मी माझ्या एका डोळ्याचे ऑपरेशन चार मे ला केले परंतु भारतीय रिझर्व बँकेच्या इंन्स्पेकशनच्या कामामुळे मी दुसऱ्या डोळ्याचे ऑपरेशन अदयाप करू शकलो नाही असे त्यांनी सांगितले.

**यावर मा. सभासद श्री. राजेंद्र गवस यांनी** तुम्ही तुमची जी व्यथा सांगितली आहे ती आम्ही मान्य करतो आणि तुमच्या कामाबद्दल अभिनंदन करतो असे सांगितले.

INCOME-TAX DEPT. CO-OP. BANK LTD. * MUMBAI *

**१८ व्या अधिमंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक २९.०८.२०२४ चे इतिवृत्त**

**मुद्दा क्रमांक ८ – आपल्या बँकेत ATM विभाग/ IMPS विभाग/ क्लेअरिंग विभाग/ डिपॉझीट विभाग/ LIC विभाग/ लोन विभाग असे स्वतंत्र विभाग नावनिशी करा आणि त्या विभागात एक व्यक्ती निदान सहा महिने एकाच ठिकाणी ठेवा कारण आजचा कर्मचारी दुसऱ्या दिवशी दुसऱ्या ठिकाणी असतो त्यामुळे सभासदांचा गोंधळ उडतो व गैरसोय होते.**

**यावर उपकार्याध्यक्ष श्री. संदिप आंबोकर यांनी सांगितले की,** ही प्रशासकिय बाब आहे बँकेमध्ये एकाच वेळी सर्व कर्मचारी उपस्थित नसतात त्यामुळे गैरहजर असणाऱ्या कर्मचारीच्या जागी दुसऱ्या कर्मचाऱ्याची व्यवस्था करावी लागते. मात्र आपण म्हणत असल्या प्रमाणे वेग वेगळे विभाग आहेत. परंतु विभागाच्या नावाच्या पाट्या लावलेल्या नाहीत.

**यावर मा. सभासद श्री. रूपेश आंबेकर यांनी सांगितले की,** पगाराच्या दिवसाच्या वेळी काऊंटरावर जास्त कर्मचारी देण्याची व्यवस्था करावी. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अजित जाधव यांनी सांगितले की, आम्ही पगाराच्या दिवशी एलआयसी काऊंटरच्या बाजुला अतिरिक्त कर्मचाऱ्यांची व्यवस्था करतो परंतु कर्मचारी संख्या कमी असल्याने आपण म्हणता तशी व्यवस्था करता येत नाही. त्यावर सभासद श्री. राजेंद्र गवस यांनी सांगितले की, जर कर्मचाऱ्यां ची संख्या कमी पडत असेल तर संचालक मंडळाने आवश्यकतेनूसार नविन कर्मचारी भरती करण्याची कार्यवाही करावी.

वरील सर्व मुद्याची आपण समाधानकारक उत्तरे मला लेखी स्वरूपात दयाल अशी मी अपेक्षा करतो असे श्री. रुपेश आंबेकर यांनी सांगितले.

**यावर उपकार्याध्यक्ष श्री. संदिप आंबोकर यांनी सांगितले की,** आपल्या सर्व प्रश्नांबाबत आम्ही सविस्तर खुलासा केला आहे. तरीही आपल्या मागणीनूसार आम्ही लेखी स्वरूपात उत्तर देऊ असे त्यांनी सांगितले.

**पत्र ३ :- पत्र क्रिष्णन मनी (सभासद क्र – ४४००) यांचे होते मात्र ते गैर हजर असल्यामुळे त्यांचे पत्र वाचुन दाखवू नये असे उपस्थित सभासदांनी सांगितल्यामुळे त्यांचे पत्र वाचण्यात आले नाही.**

**पत्र ४ :- श्री. सुरेश कोल्हे यांचे दि.२३.०८.२०२४ चे पत्र.**

मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदर पत्राचे वाचन केले. मा. सभासद श्री. सुरेश कोल्हे त्यांच्या पत्राबाबत म्हणाले की, आपण पंजाब ॲण्ड महाराष्ट्र बँकेत पैसे ठेवले होते. त्यावेळी त्या बँकेची माहिती घेतली होती का ? आणि माझा दुसरा मुद्दा असा आहे आमचे दर महिना जे पैसे कापले जातात त्याची विगतवारी जर आम्हाला मिळाली तर आमच्या कापुन गेलेल्या रकमेची आम्हाला सविस्तर माहिती मिळेल असे त्यांनी सांगितले. **यावर मुख्य कार्य कारी अधिकारी यांनी सांगितले** प्रत्येक इंट्रीची माहिती ज्या दिवशी पैसे डेबीट पडतात त्या दिवशी आपल्याला एसएमएस व्दारे पाठवली जाते. त्याच प्रमाणे आपण जर ई–मेल केलेत तर ई–मेल वर विनामुल्य आपल्याला खात्याचे स्टेटमेंट मिळू शकेल. त्याच बरोबर आपण जर बँकेचा मोबाईल ॲप रजिस्टर केला तर तिथेही आपल्याला माहिती मिळु शकेल असे त्यांनी सांगितले. त्याच प्रमाणे त्यांनी सांगितले की, पंजाब ॲण्ड महाराष्ट्र बँक ही भारतीय रिझर्व बँकेचे Financially Sound and Well Managed बँके संदर्भातील सर्व निकष पुर्ण करणारी बँक होती. त्यामुळे आपण या बँकेत गुंतवणूक केली होती. या बँकेत जवळपास सर्वच बँकांची गुंतवणूक होती. भारतीय रिझर्व बँकच्या क्रेडीट सोसायटीने जवळपास २०० कोटीची गुंतवणूक केली होती असे त्यांनी सांगितले.



INCOME-TAX DEPT. CO-OP. BANK LTD. ★ MUMBAI ★

**त्यानंतर श्री. सुरेश कोल्हे यांनी सांगितले की,** एकूण कर्मचाऱ्यांच्या २०% अधिकारी असायला हवेत त्याप्रमाणे आपल्या बँकेत फक्त तीनच अधिकाऱ्यांची आवश्यकता आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यानी सांगितले की, भारतीय रिझर्व बँक म्हणते की, तुमचे सर्व विभाग वेगवेगळे हवेत परंतु आपल्या कडे पूर्वी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याच अखत्यारीत सर्व कामे होत होती म्हणून संचालक मंडळाने आता वेगवेगळया विभागासाठी अधिकाऱ्याची नेमणूक केली आहे. त्यानी पुढे सांगितले की भारतीय रिझर्व बँकआता आपल्या पगारदार बँकाना ही स्टेट बँकेच्या पातळीवर असल्यासारखी वागणूक देते आणि त्यामुळे कामाचा व्याप वाढला आहे म्हणून जास्त अधिकाऱ्यांची आवश्यकता भासत आहे.

**पत्र ५ :- सभासद श्री. विजय झगडे यांचे दि.२६.०८.२०२४ चे पत्र.**

बँकेचे सभासद श्री. विजय झगडे यांच्या पत्राचे वाचन करण्यात आले त्यांच्या पत्रा व्दारे त्यांनी बँकेच्या होत असलेल्या प्रगती बद्दल आणि ग्राहक सेवे बद्दल सर्व संचालक आणि कार्मचाऱ्यांचे अभिनंदन केले. त्यांनी अशी सुचना केली की सभासदांना जो लाभांश दिला जातो त्याच्या १% इतकी रक्कम सभासदांच्या आरोग्य विम्यावर खर्च करावी. त्याच प्रमाणे त्यांनी त्यांना त्यांच्या व्यवहाराबाबत काही मेसेज येत नाही असेही सांगितले होते व नवीन कर्मचार्यांना प्रशिक्षण देण्यात यावे अशी सूचना त्यांनी केली होती. आपली सूचना फार चांगली आहे तरी आम्ही निश्चित त्याबाबत विचार करू असे उपकार्याध्यक्ष श्री. संदिप आंबोकर यांनी सांगितले.

**दरम्यान उपाध्यक्ष श्री. संदिप आंबोकर यांनी माहिती दिली की, आज जाहिर झालेली सबक्रिपशनच्या व्याजाची रक्कम आजच जमा करण्यात आली आहे. तसेच डिव्हिडंडची रक्कम उदया सभासदांच्या खात्यात जमा होईल.**

**पत्र ६ :- सभासद श्री. प्रशांत तांबे (सभासद क्र – ७०७७) यांचे दि.२६.०८.२०२४ चे पत्र :-** श्री. प्रशांत तांबे यांनी त्यांच्या पत्रा व्दारे मोबाईल बँकिंग बद्दल आणि संचालक मंडळ आणि कर्मचारी यांचे अभिनंदन केले होते.

**पत्र ७ :- सभासद श्री. संभाजी वाडेकर (सभासद क्र – ५५११) यांचे दि.२६.०८.२०२४ चे पत्र :-** श्री. संभाजी वाडेकर यांनी त्यांच्या पत्राव्दारे बँकेने शंभर कोटीचा कर्ज वितरणचा टप्पा बँकेने पार केला त्याबद्दल बँकेचे अभिनंदन केले होते.

**पत्र ८ :- सभासद श्री. प्रमोद दाहाट यांचे दि.२६.०८.२०२४ चे पत्र :-** श्री. प्रमोद दाहाट यांनी त्यांच्या पत्रा व्दारे संचालक मंडळाच्या आणि सर्व कर्मचारी वृंद यांच्या कामगीरी बद्दल अभिनंदनाचा ठराव घ्यावा अशी सुचना केली होती. या संदर्भात त्यांनी सांगितले की हा अभिनंदनाचा ठराव अभार प्रदर्शना आधी मला मांडण्याची परवानगी दयावी अशी विनंती त्यांनी केली.

**पत्र ९ :- सभासद श्री. संदीप धोके (सभासद क्र – ५४२०) यांचे दि.२६.०८.२०२४ चे पत्र :-** श्री. संदीप धोके यांनी त्यांच्या पत्राव्दारे संचालक मंडळाने केलेल्या बँकेच्या प्रगतीबद्दल आणि कामकाजाबद्दल तसेच कर्मचाऱ्यांच्या ग्राहक सेवेबद्दल बँकेच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या होत्या .

INCOME-TAX DEPT. CO-OP. BANK LTD. ★ MUMBAI ★

**पत्र १० :- बँकेच्या सभासद श्री. विकास राठोड (सभासद क्र – ८४७२) यांनी त्यांच्या पत्रादवारे सभासदांना गरजेच्या वेळी आर्थिक मदत केल्या बद्दल बँकेचे कर्मचारी आणि बँकेचे संचालक मंडळ विशेषतः संचालक श्री. परमानंद ठाकुर यांचे अभिनंदन केले** होते त्याचप्रमाणे त्यांनी खालील सूचना केल्या होत्या.

१. जनरल इंशुरसची रक्कम १.५० लाख वरून ३ लाख करण्यात यावी. त्याच प्रमाणे मृत्यु पावलेल्या सभासदांची रक्कम ३ लाख वरून ५ लाख करण्यात यावी.

२. मोबाईल ॲप दुसरा फोन बदलल्यावर तो चालत नाही तो चालावा अशी व्यवस्था करावी की जेणे करून मोबाईल हरवल्यास सायबर अफरातफरीची भिती रहणार नाही.

३. कर्जावरील व्याजदर कमी करावे.

यावर साभासद श्री. राजेंद्र गवस यांनी त्याच्या बाबत घडलेला सायबर अफरातफरीसंदर्भात किस्सा सागितला त्याची सर्वांनी नोंद घेतली.

**पत्र ११ :- बँकेचे सभासद श्री. विनय हेडाऊ (सभासद क्र –६६७३) यांनी त्यांच्या पत्राव्दारे कोविडमध्ये दिलेल्या सेवेबद्दल सर्व संचालक मंडळ आणि कर्मचाऱ्यांची प्रशंसा केली होती .**

**पत्र १२ :- बँकेचे सभासद श्री. सय्यद आयुब खातीब (सभासद क्र – ४७९२)** यांनी त्यांच्या पत्राव्दारे बँकेने कर्जाच्या हप्त्याची तारीख शेवटच्या दिवशी टाकल्याने जी पूर्वी पुढील महिन्याची ५ तारीख असायची याचा परिणाम सभासदांच्या सीबील स्कोरवर होत आहे. ही बाब सभासद जेव्हा बाहेरच्या बँकेतुन कर्ज घेतात तेव्हा लक्षात येते. तरी त्यांनी अशी विनंती केली होती की, कर्जाच्या हप्त्याची तारिख ५ करण्यात यावी अशी विनंती त्यांनी केली होती. या संदर्भात मा. संचालक श्री. संग्राम मुंडे यांनी असे सागितले की, पूर्वी सीएज् टॅक्नोलोजी या संगणक प्रणालीत हा प्रोबलेम होता परंतु आताच्या नविन सॉफ्टवेअरमध्ये योग्यती सुधारणा केली आहे. या संदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असे सागितले की सर्व सभासदांना माझी अशी विनंती आहे की, आपल्याला सीबील संदर्भात काही समस्या असल्यास आपण त्वरित बँकेला कळवा त्याप्रमाणे आपल्याला सुधारणा करता येईल.

**मा. सभासद श्री. राजेंद्र गवस यांनी दिलेल्या पत्राबाबत बहुतांश विषयांवर यापूर्वीच चर्चा झालेली असल्याने पुन्हा चर्चा झाली नाही.** त्यांच्या एका पत्रामध्ये त्यानी सभासदांच्या खराब होत असलेल्या सीबील रेकॉर्ड बाबत विचारणा केली होती त्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असे सागितले की, पूर्वी आपल्या बँकेत सीएज् टॅक्नोलोजीचे सॉफ्टवेअर असताना सीबील स्कोर नियमीत अपडेट होत नव्हता परंतु आता नविन सिस्टीममध्ये बऱ्यापैकी सुधारणा झाली आहे. त्यांनी पुढे सांगितले की सभासदांनी हे पुढे लक्षात घ्यावे की आपण कोणाला जामिनकी दिली असेल आणि त्याचे जर कर्ज थकीत असेल तर त्यामुळेही आपला सीबील स्कोर खराब होतो.

त्यानंतरचा त्यांचा प्रश्न सभासदांना त्यांनी बाहेरून घेतलेल्या पॉलीसीवर कर्ज मिळत नाही असा होता. या संदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असे सांगितले सभासद बाहेरून ज्या पॉलीसी घेतात त्याबाबत असा अनूभव आहे की, काही सभासद या पॉलीसीचा हप्ता नंतर भरत नाही आणि आपल्याला त्याचा मागोवा घेता येत



INCOME-TAX DEPT. CO-OP. BANK LTD. * MUMBAI *

नाही. तसेच तीन वर्षा पर्यंत पॉलीसीला सरेंडर व्हॅल्यु नसते त्यामुळे बँक अश्या पॉलीसीवर कर्ज देत नाही. मात्र तीन वर्षा नंतर जर सभासदानी पॉलीसी आपल्या बँकेच्या एलआयसी ब्रांचला ट्रांस्फर केली तर मात्र अशी पॉलीसी आपण कर्जासाठी घेतो.

**बँकेचे सभासद श्री. प्रमोद दाहाट यांनी सांगितले की,** बायलॉस्मध्ये आपल्याला काही दुरूस्ती करता येते का ? अशी विचाराणा केली. यावर उपाध्यक्ष श्री. संदिप आंबोकर यांनी असे सांगितले की आपल्याला काही दुरूस्ती असतील त्या आपण बँकेत येऊन सूचवावी रास्त सुचनांनुसार आपण त्यात बदल करू.

त्यांनी पुढे सांगितले की, जिथे जिथे आमचे कार्यालय आहेत त्या त्या प्रत्येक ठिकाणी आपल्याला इलेक्शन सेंटर देण्यात यावी असा ठराव डीडीआर यांना देण्यात यावा. या संदर्भात सभासद विजय झगडे यांनी सांगितले की, यामुळे बँकेचा खर्च वाढणार नाही याची दक्षता घ्या. तसेच श्री. रूपेश आंबेकर यांनी सांगितले की, जर खर्च वाढणार असेल तर आपण प्रशासकिय विभागाला विनंती करू की सभासदाला मतदानासाठी वेळेची सवलत मिळावी.

**त्यानंतर श्री. प्रमोद दाहाट यांनी सांगितले होते की** आपल्या कर्मचाऱ्यांना विपशनेसाठी पाठविण्यात यावे मी सरकारचा जी. आर. सुद्धा दिला होता आपल्याला फक्त विपशना केंद्राला पत्र पाठवायचे आहे परंतु त्याचीही कार्य वाही झाली नाही. या संदर्भात त्यांनी पुढे सांगितले की, याबाबत माझा जो काही विषय होता आणि शासनाचा जीआर आहे तो मी आपणास देत आहे. तसेच त्यांनी असे सांगितले की , याबाबत माझी काही मदत लागत असल्यास मला सांगावे मी ती जरूर करेन.

**मा. सभासद श्री. अंकुश मारगुडे (सभासद क्र – ३१९४) यांनी असे सांगितले** की मोबाईल ॲप मध्ये जी नावे आहेत ती सोप्या भाषेत असावी. आम्ही जेंव्हा ॲप ओपन करतो तेव्हा तिथे जनरल एसबी च्या ऐवजी एसबी अकाऊंट असे यायला हवे .या संदर्भात उपकार्याध्यक्ष श्री. संदिप आंबोकर यांनी सांगितले की, आम्ही याबाबत आयटी ऑफीसरशी चर्चा करून योग्यती सुधारणा करू. त्यानंतर त्यांनी असे सांगितले की, ॲप मध्ये एक्टेंशन काऊंटरचा संपर्क क्रमांक मोबाईल ॲपमध्ये नाही तो टाकण्यात यावा.

त्यानंतर सभासद श्री. प्रमोद दाहाट यांनी कवितेच्या स्वरुपात बँकेच्या आणि संचालक मंडळाच्या अभिनंदनाचा ठराव मांडला.

त्यानंतर मा. संचालक श्री. किरण कुबल साहेब यांनी आभार प्रदर्शन केले आणि राष्ट्रगीतानंतर सभेच्या अध्यक्षांनी सभा संपल्याचे घोषित केले.

| | | |
|---|---|---|
| मुंबई<br>दि. २३.१०.२०२४ | श्री. सुधिर राजाराम गुजर<br>मुख्य कार्यकारी अधिकारी | श्री संदीप महादेव आंबोकर<br>उपकार्याध्यक्ष |

INCOME-TAX DEPT. CO-OP. BANK LTD. * MUMBAI *